अहवाल क्रमांक : १६१

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# सतरावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, नागपूर

२०१८

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# सतरावा अहवाल

# पंचायती राज समिती

## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर,वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिति

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. * श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स..

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

९. श्री.कृष्णा गजबे,,वि.स.स.

१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१६. श्री. अमित झनक, वि.स.स.

१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

२४. * रिक्त

२५. * रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

*सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती केली आहे.

**सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिति

## (सन २०१५-२०१६)

**समिति प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिति)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्षअधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सतरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २५ मे, २०१५ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहित तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो, परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धती मधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याच प्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेस दिनांक २२, २३ व २४ फेब्रुवारी, २०१६ रोजी भेट देऊन श्री.आनंद रायते, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २३ व २४ जानेवारी, २०१८ रोजी जिल्हा परिषद, उस्मानाबाद संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. एस. एस. संधू, अपर मुख्य सचिव, सहकार विभाग,श्री.श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,श्री.विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी विभाग,श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.डी.एल.सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.वैभव राजेघाटगे, उप सचिव, वित्त विभाग, श्री.सचिन्द्र प्रताप सिंह, कृषि आयुक्त, श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, श्री.गिरीष देशमुख, सह संचालक, (वि व ले), म.प्रा.शि.प., शिक्षण विभाग, डॉ.रा.ऊ.लोकरे, कृषि उपसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे, तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने सोमवार दिनांक १६ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ जुलै, २०१८.

**सुधीर पारवे.**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उस्मानाबाद मध्ये जिल्हा परिषदेच्या गुंतलेल्या रक्कमा | १ |
| (२) | दोन | शालेय पोषण आहार | ६ |
| (३) | तीन | पंचायत समिती, वाशी अंतर्गत ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण करण्याबाबत | १० |
| (४) | चार | शालेय आरोग्य तपासणीबाबत | १२ |
| (५) | पाच | प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारती बांधण्याबाबत | १४ |
| (६) | सहा | उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणाबाबत | १७ |
| (७) | सात | जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत वाढीव उपकराची थकबाकी | १९ |
| (८) | आठ | जिल्हा परिषद उस्मानाबाद मधील अफरातफर व गैरव्यवहारात गुंतलेली रक्कम वसुल करणेबाबत | २१ |
| (९) | नऊ | सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत झालेला गैरव्यवहार | २८ |
| (१०) | दहा | गाळेधारकाच्या थकित भाडे वसुलीबाबत | ३५ |
| (११) | अकरा | विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभांना उपस्थित न राहण्याबाबत | ३७ |
| (१२) | बारा | ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत | ४० |
| | | **परिशिष्ट** | ४५ |
| | | शासनाचे आदेश व परिपत्रके आणि | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उस्मानाबाद मध्ये जिल्हा परिषदेच्या गुंतलेल्या रक्कमा

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे पदाधिका-यांना पंचायती राज समितीच्या वतीने अनौपचारिक बैठकीस निमंत्रित केले असता स्थानिक लोकप्रतिनिधींनी समितीस विदित केले की, उस्मानाबाद जिल्हयाच्या विकासाच्या अनुषंगाने महत्वाचा विषय असा आहे की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्हा परिषदेचे ६० कोटी रुपये अडकले आहेत. यातून काही तरी मार्ग काढावा लागणार आहे. कारण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे लिक्वीडीटी नाही. ३०० कोटी रुपये येणे आहे त्यामुळे सहकार मंत्री, ग्रामविकास मंत्री, आयुक्त, सचिव यांची एकत्रित बैठक याकरिता बोलावण्यात यावी व मार्ग काढण्यात यावा. ही बैठक मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झाली तर बरे होईल. जिल्हा बँकेचे चेअरमन व एम.डी., तेरणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व एम.डी., तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व एम.डी., साखर आयुक्त, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी यांची एकत्रित बैठक घेतल्यास त्यातून मार्ग निघेल. तेरणा व तुळजाभवानी कारखान्याचे २०० कोटी रुपये मुद्दल येणार आहे. सर्व संबंधितांची अशी बैठक झाल्यास मार्ग निघू शकेल. शासनाने अजूनही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मदत केलेली नाही. निधी अडकल्यामुळे काही कामे होत नाहीत. सहकार आयुक्त, सहकार सचिव, साखर आयुक्त यांची या विषयावर सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला भेट दिली असता उस्मानाबाद जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्हा परिषदेचे ५९ कोटी रूपये अडकले असून यासंदर्भात समितीने निर्देशित केलेप्रमाणे विभागाने बैठक घेवून प्रस्तुत प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केलेली आहे ?

(२) ग्रामविकास विभाग वित्त-३ व्दारा जिल्हा परिषदेच्या मध्यवर्ती बँकेतील जिल्हा परिषदेच्या ठेवी काढून घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी सचिव, सहकार यांना जिल्हा परिषदांच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेतील जिल्हा परिषदेच्या ठेवी परत मिळण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात येवूनही सहकार विभागाने या संदर्भात कोणतीही कारवाई केली नाही, विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये रक्कम रू. ५९,१३,०१,६८९/- इतकी रक्कम अडकलेली आहे. सदर रक्कम परत मिळणेकरीता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उस्मानाबाद व शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(२) जल्हा परिषदेचा निधी प्राप्त करून घेणेसाठी मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग व मा. सचिव, सहकार व संसदीय कार्य यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**(वित्त-३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम ४९ नुसार जिल्हा परिषदांना, त्यांचा जिल्हा निधी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवणे आवश्यक बंधनकारक आहे. मात्र वित्त विभागाने दिलेल्या सूचनेनुसार या विभागाच्या दिनांक ५/७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी धुळे, नंदुरबार, उस्मानाबाद,बुलढाणा, वर्धा व नागपूर यांना पत्र पाठवून जिल्हा परिषदांच्या आर्थिक ठेवी सर्वार्थाने सुरक्षित राहाव्यात याकरीता तातडीने कार्यवाही करणेबाबत शासन स्तरावरून निर्देश देण्यात आले आहेत.

माहे जूलै, २०१२ मध्ये शासनाच्या परवानगीने जिल्हा परिषदेची सर्व खाती राष्ट्रीयकृत बँकेत (एस.बी.एच.) मध्ये उघडण्यात आली असून वेतन व भत्त्याचे प्रदान वेळोवेळी त्या-त्या महिन्यांत शासनाकडून प्राप्त होणा-या वेतनाच्या कॅशफ्लोप्रमाणे वेतनाचा खर्च करण्यात आलेला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकून पडलेला निधी हा वेतन व भत्ते यांचा अखर्चित निधी शासनास परत करणे तसेच योजना व विकास कामाचा असल्यामुळे, अपूर्ण कामे पूर्ण करण्यांस व अखर्चित निधी शासनास भरणा करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विकास कामांवर विपरीत परिणाम होत आहे.

प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांस या विभागाकडून दिनांक ६ मे, २०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा निधीचा जिल्हा सहकारी बँकेत अडकलेला विकास निधी राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याबाबत त्या विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

तसेच जिल्हानिधीची रक्कम सुरक्षित रहाण्याच्या दुष्टीने संबधीत जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घेणेबाबत व योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते, शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्याबाबतच्या सूचना दि. ११/८/२०१४ च्या पत्राद्वारे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

**सहकार विभागाचे अभिप्रायः-**

मुद्दा क्रमांक १ व २ ग्राम विकास विभागाशी संबंधित

(३) पंचायत राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेला भेट दिली. त्यावेळी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये जिल्हा परिषद उस्मानाबादच्या एकूण रू ५९५०.०७ लाख इतक्या ठेवी होत्या. सदरच्या ठेवी जिल्हा परिषदेस अद्यापी परत करण्यात आलेल्या नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे दिनांक ९ मे, २०१२ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकींग रेग्युलेशन ॲक्टचे कलम ३५ (अे) लागू केल्यामुळे या बँकेच्या आर्थिक व्यवहारावर निर्बंध घालण्यात आले आहेत. या बँकेने केलेल्या कर्जवाटपामध्ये बहुतांश कर्जे ही बिगरशेतीची असून याबाबत बँकेस मोठ्या प्रमाणात १००% एनपीए पोटी तरतूद करावी लागलेली आहे. यामुळे बँकेच्या संचित तोटा रकमेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेने त्यांचेकडे असलेल्या ठेवी (जिल्हा परिषदेच्या ठेवीसह) परत करण्यासाठी बँकेमार्फत केलेल्या कर्ज वाटपामधून वसूली करणे गरजेचे आहे. थकीत कर्ज वसुलीसाठी बँकेने प्रयत्न केले आहेत. बँकेची साखर कारखान्याकडे असलेली थकीत कर्जवसुली व छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या कर्जमाफी योजनेमध्ये शेतक-यांच्या कर्जापोटी प्राप्त होणारी रक्कम मिळाल्यानंतर जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्या ठेवी परत करणे शक्य होईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उस्मानाबाद येथे जिल्हा परिषदेच्या गुंतलेल्या रकमा यासंबंधात माहिती देण्यात यावी. याबाबत अपर सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, महाराष्ट्र राज्यामध्ये पूर्वीपासून जिल्हा परिषदेकडे निधी ठेवण्याचे निदेश होते. त्याप्रमाणे राज्यातील जिल्हापरिषदा विविध बँकांमध्ये निधी ठेवायच्या सन २०१२ च्या पूर्वी व त्यांनतर तो निधी ठेवणे बंद झाले. त्यामुळे ब-याच बँकांमध्ये हा निधी प्रलंबित राहिला आहे आणि तो परत होऊ शकला नाही. उस्मानाबादमध्ये सुध्दा उस्मानाबाद, नागपूर, वर्धा, नांदेड, बीड, जालना, बुलढाणा अशा प्रकारच्या ७ जिल्हा परिषदांचे पैसे विविध बँकांमध्ये अडकलेले आहेत. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खूपच खराब झालेली आहे. मधल्या कालावधीमध्ये नागपूर, वर्धा आणि बुलढाणा यांचे अनुज्ञप्ति मिळण्याची सुध्दा अडचण निर्माण झाली होती. त्यावेळी शासनाने सर्व खातेदारांचे पैसे सुरक्षित राहावे त्या दृष्टीकोनातून शासनाने आणि केंद्र शासनाने मिळून या तीन बँकांसाठी नाबार्डच्या सहाय्याने ५५०कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आणि नंतर त्यांना अनुज्ञप्ति बहाल करण्यात आले. त्यामुळे नागपूर आणि बुलढाणा येथील बँका थोडया चांगल्या परिस्थितीत आहेत पण वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अजूनही अडचणीत आहे.

यावर समितीने विचारणा केली की, उस्मानाबाद जिल्हामध्ये काय परिस्थिती आहे, शासनाने यासाठी पैसे दिलेले आहेत काय, त्यांची अनुज्ञप्तिचे काय झाले, याबाबत अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, त्यामध्ये अनुज्ञप्तिचा मुद्दा नव्हता आणि त्यांच्या अनुज्ञप्तिचे नुतनीकरण झाले परंतु त्यांची मागणी ज्यावेळी होती त्यावेळेस काही बँकानाच शासन ते देऊ शकले आणि बाकीच्यांना देऊ शकले नाही. हा सन २०१२-१३ चा विषय आहे. त्यानंतर कोणत्याही बँकांना तशी रक्कम देण्यात आली नाही. बँकांची जी देणी आहेत त्यातून त्यांनी हे पैसे परत करणे आवश्यक आहे. परंतु आता उस्मानाबाद जिल्हयाची परिस्थिती बघितली तर त्यांच्याकडे एकूण ६० कोटी रुपये देणी आहेत आणि इतर अग्रिमामध्ये त्यांची ४३४ कोटी रुपये देणे आहेत. सहकारी बँकेची १८० कोटी रुपयांची देणी आहेत. इतरांना ती देणी देण्याच्या मोठया प्रमाणावरील प्रश्न आहे. परंतु ज्यांच्याकडून पैशाची वसूली झाली ते जवळपास ५८८ कोटी रुपये पिककर्जाचे आहेत आणि अकृषी क्षेत्रामध्ये २ साखर कारखान्यांमध्ये त्यांच्या रकमा गुंतलेल्या आहेत, त्या आणखी परत येऊ शकल्या नाहीत.

यानंतर समितीने विचारणा केली की, नागपूरच्या बँकांनी दुसरीकडे पैसे गुंतवलेले असल्यामुळे त्या सर्व डबघाईस आल्या आणि त्यांचे पैसे डुबले आहेत. उस्मानाबादमध्ये तसे काही झालेले आहे काय असे समितीने विचारणा केली असता, याबाबत अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, यामध्ये प्रामुख्याने दोन बाजू आहेत. पिककर्जामध्ये ५८८ कोटी रुपये म्हणजे हे पैसे आता काही शेतक-यांकडून परत येणार नाहीत, कारण आता आपण कर्जमाफीची योजना लागू केलेली आहे त्यापैकी ५५ कोटी रुपये मिळालेले आहेत. मात्र आता त्यांना किती पैसे मिळतील यावर हे सर्व अवलंबून आहे म्हणून फक्त पिककर्जाची ६१ टक्के थकबाकी त्यांच्याकडे आहे. यातील दुसरा भाग हा अकृषी क्षेत्राचा आहे. त्यात १८३ कोटी रुपये तेरणा आणि तुळजाभवानी या दोनच कारखान्यामध्ये गुंतलेले आहेत. त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली अशी विचारणा केली असता याबाबत कारखान्याची जप्ती करुन त्याची विक्री करायला लावावी अशी माहिती दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शेतक-यांची बँक ही ग्रामीण भागातील शेतक-यांचे आर्थिक स्त्रोत बळकट करण्याकरिता आहे. कारखानादारांने करोडो रुपये घेऊन ही सर्व बँक डबघाईस आणून त्यांच्याविरुध्द फक्त नोटीसच पाठविण्यात आली,१०० वर्षाची जुनी बँक असून देखील त्यामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झालेली आहे. ही शेतक-यांची बँक असल्यामुळे १ लाखापर्यंत शुन्य टक्के व्याजाने कर्ज दिले जात होते. अशा अवस्थेत शेतक-यांना डुबवण्याचे काम कारखानदारांनी केलेले आहे त्यांच्यावर काही कारवाई किंवा त्यांच्यावर कोणते फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत काय, सदरहू मुद्यावर अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, कारखान्याच्या विरुध्द त्यांना सलग्नीकरण आणि विक्री करण्याच्या विरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

सदरहू प्रकरण कोणत्या कालावधीतील आहे, त्याची थकबाकी कधीपासून आहे आणि कारवाई केव्हा केली, वसुली करण्यासाठी काय प्रयत्न केले आहेत असा उपप्रश्न विचारला असता, त्याबाबत सन २०१२ मध्ये मुख्य कार्यकारी अधिका-यांनी कारवाई केली आहे आणि या संदर्भात ते वेळोवेळी डी. आर. टी. कडे जातात. तेरणा येथील कारखान्यामध्ये त्यांच्या केसेस अजूनही चालू आहेत.

समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे पैसे हे मुदत ठेवी मध्ये होते की, सी.सी. मध्ये होते. कारण ती जर मुदत ठेव असेल तर आम्ही मान्य केले असते कारण जिल्हा परिषदेची मुदत ठेव दोन वर्षासाठी दुसरीकडे गुंतवू शकतात पण चालू खात्याचे पैसे कसे वापरले ? कारण चालू खात्यामधील पैसे जिल्हा परिषदेने मागितले तेव्हा द्यायला पाहिजे. तसेच चालू खात्यामध्ये १० कोटी रुपये दुसरीकडे गुंतवू शकता काय अशी समितीने विचारणा केली असतायाबाबत अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी समितीस विदित केले की, याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल. चालू खात्यात पैसे गुंतविण्यात काही बंधन नाही, पण त्यांनी ते परत केलेपाहिजे, कारण त्यांच्याकडे ही ठेव आहे आणि सुरक्षित आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा मध्यवर्ती बँक ही सहकार कायद्यामार्फत चालते पण तसा कारभार होत नसल्यामुळे त्या बँकेवर कोणती कारवाई करणे आवश्यक आहे, याबाबत अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, सहकारी कायद्यामध्ये रिजर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्यांना जे करता येईल त्यांनी ते करावे. त्यांनी जर असे केले नसेल तर ती कारवाईस पात्र आहेत. यातील तरतुद काय आहे ते पाहून समितीला माहिती देण्यात येईल.

ब-याच कालावधीपासून रक्कम अडकून आहे. आपण त्याला ताब्यात घेऊन त्याचा लिलाव केला असे सांगितले. मग तो लिलाव केल्यानंतर कारखान्याचे दिलेले कर्ज वसूल झाले आहे काय यावर अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, होय, त्यांनी डी. आर.ए.टी. कडून स्थगिती घेतली आणि त्या ठिकाणी ते प्रकरण चालू आहे. डी. आर. ए. टी. कडे आव्हान करता येते. शेतक-यांच्या वतीने शासनाने जे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला त्यातुन बँकांचे पैसे रिकव्हर होतील अशी समितीस माहिती विशद करण्यात आली.

बँकांचे कर्ज अवसानायात काढण्याच्या संदर्भात आपण यापूर्वी बोलले आहात. त्यांच्याकडून बँकांनी पैसे वसूल करण्याची काय प्रक्रिया आहे अशी विचारणा समितीने केली असता त्याबाबत सचिव, सहकार विभाग यांनी सदरहू प्रश्न सुटणे अवघड आहे. कारण आपण वर्धा बँकेचा विचार केला तर ती बँक आता लोकांचे पैसे देऊ शकत नाही अशी स्थिती आहे. म्हणजे हळूहळू आपआपल्या बँक अवसानायामध्ये काढावी लागेल आणि त्यात लोकांचे पैसे सुरक्षित राहत नाहीत. म्हणजे शासनाचा जो निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये जसे जिल्हा परिषदेचे पैसे अडकले आहेत तशाच प्रकारे इतर ठेवीदारांचेही पैसे अडकले आहेत. आता यामध्ये वसुलीबाबत अन्य कोणताही स्त्रोत नाही. जर ही बँक वाचली आणि अन्य बँकेमध्ये मर्ज झाली तर अशा प्रकारच्या पर्यायातून हा निधी मिळू शकेल. अन्यथा ही बँक अवसायनामध्ये गेल्यानंतर त्या बँकेची जी मिळकत असेल त्यामधून जी वसूली होईल त्यातून हक्काच्या रकमा ज्या लोकांना परत करायच्या आहेत त्या मिळू शकतील असे समितीला विदित करण्यात आले.

समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने त्या कारखान्यांची मालमत्ता लिलावात काढून बँकेने जिल्हा परिषदेचे पैसे परत द्यावेत, याबाबत अपर मुख्य सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, सध्या तेच सुरु आहे. न्यायालीन प्रक्रियेमध्ये एका प्रकरणात डी. आर. टी. ने स्थगिती दिली आहे. एका प्रकरणात रद्द केला आहे. बँकेच्या बाजूने निकाल आवश्यक असताना तो कारखान्यांच्या बाजूने लागला आहे. आता आपल्याला काही तरी प्रयत्न करुन तो कारखाना पुन्हा चालवण्यास घेतला तर त्यातून बँकेला पैसे मिळू शकतील अशी माहिती त्यांनी समितीला दिली.

यावर समितीने खुलासा केला की, तो दुसरा भाग आहे. आपल्यासाठी एवढाच प्रश्न आहे की. ग्रामविकासचा म्हणजे जिल्हा परिषदेचा बँकेने डुबविलेला निधी वसूल कसा होईल. हा निधी वसूल करण्यासाठी बँकेने ज्या ठिकाणी गुंतवणूक केली आहे, त्या मालमत्तेचा लिलाव करावा. या बाबतीत जिल्हा परिषदेला बँकेने प्रथम वचनबध्द करावे. हे साखर कारखाने शासनाच्या उपक्रमातून वा शासन अनुदानित नव्हते. तेरणा सहकारी साखर कारखाना आणि तुळजा भवानी सहकारी साखर कारखाना असे कारखाने आहेत. हा जिल्हा परिषदेचा निधी अशा खासगी साखर कारखान्याला देणे हीच तर मूळात मोठी चूक होती. यामध्ये आपल्याला दुसरा मार्ग आहे. ज्या कारखान्याला बँकेने कर्ज दिले त्या कारखान्याच्या मालमत्तेवर बोजा लावण्यात यावा, त्या कारखान्याने मुदतीमध्ये रकमेची परतफेड केली नाही त्या कारखान्याच्या मालमत्तेचा लिलाव करुन, करुन जिल्हा परिषदेचा निधी प्रथम परत मिळवून घेण्यात यावा असे उपप्रश्न विचारले असता, मी या ठिकाणी पूर्ण निवेदन केले आहे की, या बाबतीत जी प्रक्रिया करायला हवी ती प्रक्रिया रितसर आहे.बँकेने सरफेशी ॲक्टखाली जेव्हा कारवाई केली ही कार्यवाही कायद्याने करता येते. ती कार्यवाही झाल्यानंतर कारखान्याने पुढील कोर्टामध्ये त्यास आव्हान दिले. त्या प्रकरणामध्ये तुळजा भवानी सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत बँकेच्या विरुध्द निकाल दिला आहे. त्यामुळे ते प्रकरण अद्याप प्रलंबित आहे.

दुसरा म्हणजे तेरणा सहकारी साखर कारखान्याकडे आपली जवळपास १२७ कोटी रुपयांची वसुली अडकलेली आहे. त्या प्रकरणी केस अद्याप सुरु असून त्यावर खालच्या डी.आर.टी.ने स्टे दिला होता तेथे आता केस सुरु आहे. मात्र जोपर्यत हे प्रकरण निकाली लागत नाही तोपर्यंत कोणतीही कार्यवाही करता येणर नाही. यावर आम्ही असा तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्याचे आमच्या विचाराधीन आहे की, कारखाना आणि बँकेने बसून मार्ग काढणे. कारण कारखाना आता जुना होत चालला आहे. तो कारखाना मागील ४-५ वर्षापासून बंद आहे. त्यामुळे त्याची हळूहळू झीज होऊन लोकं त्याचे सर्व दरवाजे व सामान घेऊन जात आहेत. जर तो कारखाना पुन्हा चालविण्यास दिला तर बरे होईल. या बाबतीत मागे सुध्दा मंत्री महोदयांशी चर्चा झाली की, हा कारखाना त्यांना पुन्हा चालविण्यास दिला किंवा कारखानदाराने दुस-या कोणाला भाडयाने दिला तर त्यातून पैसे मिळू शकतील आणि त्यामधून आपले पैसे रिकव्हर होऊ शकतील,परंतु हा तडजोडीचा मार्ग आहे. मात्र जोपर्यंत कोर्टाचा स्टे उठत नाही तोपर्यंत आपल्याला काहीच करता येणार नाही. दोन्ही पक्षांनी बसून निर्णय घेतला तर बरे होईल असे सांगण्यात आले.

### अभिप्राय व शिफारशी

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये जिल्हा परिषद उस्मानाबादचे रुपये ५९,१३,०१,६८९/- इतकी रक्कम अडकलेली आहे. सदर रक्कम परत मिळणेकरीता उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व शासनाकडे जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. उस्मानाबाद जिल्ह्याच्या विकासाच्या अनुषंगाने उपरोक्त अडकलेली रक्कम जिल्हा परिषदेला लवकरात लवकर प्राप्त व्हावी हा महत्वाचा विषय आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरणा सहकारी साखर कारखाना तसेच तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याचे रुपये २०० कोटी मुद्दल जिल्हा बँकेत येणे असल्याचे पंचायती राज समितीला अनौपचारिक चर्चेदरम्यान सांगण्यात आले.

ग्रामविकास विभागाचे असे अभिप्राय आहेत की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम ४९ नुसार जिल्हा परिषदांना त्यांचा जिल्हा निधी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवणे आवश्यक व बंधनकारक आहे. मात्र वित्त विभागाने दिलेल्या सुचनेनुसार वित्त विभागाच्या दिनांक ५ जुलै, २०१२ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, नंदुरबार, उस्मानाबाद, बुलडाणा, वर्धा व नागपूर यांना पत्र पाठवून जिल्हा परिषदांच्या आर्थिक ठेवी सर्वार्थाने सुरक्षित रहाव्यात याकरिता तातडीने कार्यवाही करणेबाबत शासन स्तरावरुन निर्देश देण्यात आलेले आहेत. माहे जुलै, २०१२ मध्ये शासनाच्या परवानगीने जिल्हा परिषदेची सर्व खाती राष्ट्रीयकृत बँकेत (एस.बी.एच) मध्ये उघडण्यात आली आहेत तसेच दिनांक ६ मे, २०१३ रोजीच्या वित्त विभागाच्या पत्रान्वये जिल्हा निधीचा जिल्हा सहकारी बँकेत अडकलेला विकास निधी राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तसेच सहकार विभागाच्या अभिप्रायानुसार जिल्हा परिषद, उस्मानाबादच्या ठेवी उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँकेने अद्यापि परत न करण्याचे मुख्य कारण म्हणजे दिनांक ९ मे, २०१२ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकींग रेग्युलेशन ॲक्टचे कलम ३५ (अे) लागू केल्यामुळे उस्मानाबाद जिल्हा बँकेच्या आर्थिक व्यवहारावर निर्बंध घालण्यात आले आहेत. या बँकेने केलेले बहुतांश कर्ज वाटप बिगर शेतीचे असल्याने बँकेस मोठ्या प्रमाणात १००% एनपीए पोटी तरतुद करावी लागलेली आहे. यामुळे बँकेच्या संचित तोटा रक्कमेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

उपरोक्त अभिप्रायावरुन समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही ग्रामीण भागातील शेतक-यांचे आर्थिक स्त्रोत बळकट करण्याकरिता आहे. कारखानदाराने करोडो रुपये घेऊन ही बँक डबघाईस आणून कारखानदारांना फक्त नोटीसच पाठविण्यात आलेले आहे. १०० वर्षांची जुनी बँक असून देखील बँकेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. ही बँक शेतक-यांची बँक असल्यामुळे १ लाख रुपयांपर्यंत शुन्य टक्के व्याजाने कर्ज दिले जात होते. अशा अवस्थेत शेतक-यांना डुबवण्याचे काम कारखानदारांनी केलेले आहे. त्यांच्यावर कोणतीही कारवाई किंवा फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत, केवळ कारखान्याच्या विरुध्द संलग्नीकरण आणि विक्री करण्याच्या विरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

सबब, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सहकार कायद्यामार्फत चालते पण त्याप्रमाणे बँकेतील कारभार आवश्यक आहे. ब-याच वेळा बँकांकडून कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन होत असल्यामुळे या अनियमितता करणा-या बँकांवर सहकार विभागाने कारवाई करणे आवश्यक आहे,या प्रकरणी बँकेकडे पिक कर्जाची ६१ टक्के थकबाकी आहे. उर्वरित थकबाकीचा भाग अकृषी क्षेत्राचा आहे यामध्ये तेरणा सहकारी साखर कारखाना व तुळजाभवानी सहकारी साखर कारखाना या दोन साखर कारखान्यांमध्ये रुपये १८३ कोटी एवढी रक्कम गुंतलेली आहे. कर्ज वसुली लवादाने (डी.आर.टी) तेरणा सहकारी साखर कारखान्याच्या कर्ज वसुलीस स्थगिती दिली आहे. सदर वसुलीस स्थगिती दिल्यामुळे त्याविरुध्द अपील करणे आवश्यक आहे किंवा नाही हे ही तपासणे आवश्यक आहे. तसेच तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत मा.न्यायालयात बँकेच्या विरुध्द निकाल लागला असल्यामुळे बँकेने कर्ज वसुली लवाद व मा.न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून रक्कम वसुली होण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया करावी. सदर रक्कमेच्या वसुलीकरीता सचिवांनी समितीस आश्वासित केल्याप्रमाणे कारखान्यांविरुध्द कडक स्वरुपाची कारवाई करुन वसुली संदर्भात शक्य त्या सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन तात्काळ वसुली करुन सदरची रक्कम शासकीय कोषागारात भरणा करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

## प्रकरण दोन

### जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### शालेय पोषण आहार

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडून अभिकरण तत्त्वावर सोपविलेल्या योजनांपैकी 'शालेय पोषण आहार कार्यक्रम' ही योजना राबविली जाते काय असल्यास, योजनेचे स्वरुप काय आहे. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, जिल्हयामध्ये शालेय पोषण आहार योजना राबवली जाते. शालेय पोषण आहार योजना दिनांक २२ नोव्हेंबर,१९९५ पासून सुरु झाली आहे.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, समितीने करजखेडा जि.प.शाळेला भेट दिली होती त्यावेळेस धान्याचे पोते अर्ध्यापेक्षा कमी असल्याचे आढळून आले होते. तसेच धान्याचे वजन करण्यासाठी मुलांच्या वजन करण्याच्या काटयाचा उपयोग केला जात असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे पुरवठा दाराने प्रत्येक शाळेमध्ये वजनकाटा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे. पुरवठा दाराने प्रत्येक शाळेमध्ये धान्य मोजण्याचा वजनकाटा उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी ॲक्शन घेण्याची आवश्यकता आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शालेय पोषण आहाराच्या बाबतीत समितीला ब-याचशा गोष्टी निदर्शनास आलेल्या आहेत. शालेय पोषण आहाराचा पुरवठादार हा राज्यस्तरावरुन निश्चित होत असतो. अटी व शर्तीनुसार पुरवठादाराकडून बंधपत्र करुन घेण्यात आलेले असते. समितीला ज्या त्रुटी आढळून आलेल्या आहेत त्या संदर्भात तात्काळ कारवाई करण्यात येईल. बंधपत्रामध्ये अटी व शर्ती असताना पुरवठादाराने चुकीच्या पध्दतीने पुरवठा केला असेल तर अशा पुरवठादारांना काळ्या यादीत सुध्दा टाकण्यात येईल.शालेय पोषण आहाराची योजना आपण सन १९९५ पासून राबवित आहोत. या योजनेमध्ये केंद्रसरकाचा मोफत तांदूळ उपलब्ध होत असतो. तांदुळ आणण्यासाठी ठेकेदार निश्चित केलेला असतो. उपस्थितीनुसार तांदूळ मागविला जात असतो. परंतु त्यामध्ये ब-याच वेळेला गैरव्यवहार होत असतो. जी मुले शाळेत येतात त्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. समितीला अशी विनंती करावयाची आहे की, शालेय पोषण आहारासाठी जो काही खर्च येतो तो खर्च लाभार्थ्याच्या आईच्या खात्यामध्ये थेट जमा केला व लाभार्थ्याच्या आईने योग्य ती काळजी घेतली तर या योजनेमध्ये जे गैरप्रकार होतात ते थांबवले जाऊ शकतील. स्थानिक पातळीवर सुध्दा यामध्ये गैरप्रकार होत असतात. त्यामुळे समितीला नम्र विनंती आहे की, जर लाभार्थ्याच्या आईच्या खात्यात थेट पैसे जमा केले तर त्याचा चांगला फायदा होऊ शकेल. विद्यार्थ्यांची उपस्थितीनुसार लाभार्थ्याच्या आईच्या खात्यात पैसे जमा झाले तर चांगले होईल.

यावर समितीने असे नमुद केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शालेय पोषण आहार योजनेच्या संदर्भात चांगली कल्पना मांडलेली आहे. अशा प्रकारे योजना राबवली तर विद्यार्थ्यांची संख्या देखील वाढू शकेल. ज्या उद्देशासाठी ही योजना सुरु केली आहे त्या उद्देशासाठीच या योजनेचा पैसा खर्च झाला पाहिजे. या योजनेमध्ये काही वर्षापूर्वी लाभार्थ्याला तांदूळ दिला जात होता परंतु काही लाभार्थ्यांचे कुटुंब हा तांदुळ बाहेर विकत होते. त्यामुळे शासनाने आहार शिजवून देण्यास सुरुवात केली. तसेच समितीने एका शाळेला भेट दिली असता त्या शाळेमध्ये धान्याचे वजन करण्यासाठी ठेकेदाराने वजन काटा उपलब्ध करुन दिलेला नव्हता. तसेच खराब मशीन शाळेला उपलब्ध करुन दिली जाते किंवा मुलांचे वजन करण्याचा वजन काटा उपलब्ध करुन दिला जातो. ज्या पोत्याचे वजन ५० किलो पाहिजे त्या पोत्याचे वजन ३० ते ३५ किलोचे असते. या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात समितीला साक्षीच्यावेळी निर्णय घेणे सोपे जाईल. त्यासंदर्भात सचिवांची साक्ष आयोजित केली जाईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) शालेय पोषण आहार योजना दिनांक २२ नोव्हेंबर १९९५ पासून सुरु झाली असून शालेय पोषण आहार योजनेमध्ये कमी दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचे प्रत्यक्ष भेटीच्यावेळी समितीस निदर्शनास आले आहे. समितीने करजखेडा ता.जि उस्मानाबाद जिल्हा परिषद शाळेला भेट दिली असता धान्याचे पोते अर्ध्यापेक्षा कमी असल्याचे आढळुन आले होते. तसेच धान्याचे वजन करण्यासाठी मुलांच्या वजन करण्याच्या काटयाचा उपयोग केला जात असल्याचे दिसुन आले त्यामुळे पुरवठा दाराने प्रत्येक शाळेमध्ये वजन काटा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. बंधपत्रामध्ये अटी व शर्ती असताना पुरवठादाराने चुकीच्या पद्धतीने पुरवठा केला असेल तर अशा पुरवठादारांना काळयायादीत टाकण्याचे समितीने निर्देश दिले आहेत. सदरहु प्रकरणी विभागाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली याबाबत अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय आहेत ?

(२) तसेच शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात वेळेवर मालाचा पुरवठा होणे, मालाचा दर्जा सुधारणे, स्वच्छता तसेच बोगस विद्यार्थी संख्या दाखवून शालेय पोषण आहारातील गैरव्यवहार व अनियमितता थांबविणे या संदर्भात विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) शालेय पोषण आहार योजनाअंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील जि.प.व खाजगी अनुदानीत अशा एकुण १५३८ शाळांना पुरवठादार संस्था महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई विभागीय शाखा लातुर यांचेकडुन तांदुळ व धान्यादी मालाचा तालुक्याच्या मागणीप्रमाणे पुरवठा करण्यात येतो. सदर शाळांना पुरवठादारामार्फत पुरवठा करण्यात येत असून सन २०१६-१७ मध्ये पुरवठादार संस्थेस जिल्ह्याची एकुण तांदुळ मागणी ४३९६८९४ कि.ग्रॅ. असुन सन २०१७-२०१८ मध्ये एकुण तांदुळ मागणी २९६७९९२ कि.ग्रॅ. एवढी असुन मागणी प्रमाणे शाळांना तांदुळ प्राप्त झाला असुन मु.अ. यांनी सादर केलेल्या पोहोच पावती नुसार मागणी प्रमाणे तांदुळ व धान्यादी अहवालाची गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक वर्ग-२ शापोआ यांचे स्तरावरून तपासणी करण्यात आलेली असुन मागणीप्रमाणे तांदुळ व धान्यादी माल पुरविण्यात आल्याची खात्री करण्यात आलेली आहे. तसेच पुरवठा करण्यात येत असलेल्या धान्यादी मालाची तपासणी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा सोलापूर यांचेकडुन करण्यात येते तसेच प्रयोग शाळेच्या अहवालानुसार या जिल्ह्यामध्ये पुरवठादारामार्फत वितरीत करण्यात येत असलेला धान्यादी माल हा चांगल्या दर्जाचा असलेबाबत निदर्शनास येते. त्यानुसार धान्यादी मालाच्या देयकासोबत पुरवठा करण्यात आलेला तांदुळ व धान्यादी माल मागणीप्रमाणे व योग्य वजनाचा प्राप्त झाल्याबाबत सर्व गटशिक्षणाधिकारी/अधीक्षक वर्ग-२ शापोआ पंचायत समिती सर्व यांचे स्वाक्षरीने प्रमाणपत्र सादर करण्यात येते.

(२) पुरवठादारासोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. ७ नुसार पुरवठादाराने वाहनात प्रमाणित वजन काटा ठेवून मागणी प्रमाणे तांदुळ व धान्यादी मालाचे वजन करून पुरवठा करणे बंधनकारक आहे. सदरील अटीप्रमाणे पुरवठादाराने तांदुळ व धान्यादी माल वजन करून पुरवलेला आहे. त्याबाबतचे प्रमाणपत्र तालुक्याच्या प्रत्येक दोन महिन्याच्या पुरवठा देयकावर उपलब्ध आहे.

(३) मा. पंचायत राज समितीने जि.प.प्रा.शा. करजखेडा ता. उस्मानाबाद या शाळेस दिनांक २३-०२-२०१६ रोजी भेटीच्या वेळी तत्कालीन मुख्याध्यापक यांनी मालाच्या वजनाची खात्री करून देता यावी या हेतूने मुलांच्या वजन करण्याचा काटा शाळेत ठेवलेला होता मात्र उक्त बाब विचारात घेता शाळेमध्ये वजनकाटा ठेवण्याची आवश्यकता नाही.

(४) मा. पंचायत राज समिती प्रमुखांच्या सुचनेनुसार प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने (१) उपशिक्षणाधिकारी (प्रा), (२) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भूम, (३) लेखाधिकारी शा.पो.आ. यांचेमार्फत दि. ०६-०१-२०१८ रोजी चौकशी करण्यात आली असून माहे डिसेंबर-जानेवारी, २०१६ ची.जि.प. प्रा.शा करजखेडा शाळेची एकुण तांदुळ मागणी १६०० कि.ग्रॅ इतकी होती व त्यानुसारच शाळेला पुरवठादारामार्फत एकुण १६०० कि.ग्रॅ. वजनाचा तांदुळ प्राप्त झालेला आहे. चौकशी समितीचे खालीलप्रमाणे निष्कर्ष आहेत. (१) शाळेमध्ये सद्य परिस्थितीमध्ये वजनकाटा उपलब्ध असल्याचे दिसुन आले. (२) शालेय पोषण आहार योजनेच्या नोंदवह्या अद्यायावत आहेत. (३) शाळेच्या पटसंख्येनुसारच ताटांची संख्या नोंदवहीवर तसचे सरल ऑनलाईन प्रणालीवर दररोज नोंदविण्यात येते. त्यामुळे बोगस विद्यार्थी संख्या नोंदविली जात नसल्याचे दिसुन येते असे निष्कर्ष चौकशी समितीने नोंदविलेले आहेत.

(५) पुरवठादाराने करारनाम्यातील अटी व शर्ती नुसारच तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा केल्याची खात्री केलेली असुन त्याबाबतचे प्रमाणपत्र सर्व तालुक्यांनी सादर केलेले असल्यामुळे पुरवठादारास काळ्या यादीत टाकण्याची आवश्यकता नाही.

(६) परंतु मा.पंचायती राज समितीने घेतलेल्या आक्षेपानुसार पुरवठादार महाराष्ट्र स्टेट को.ऑ.कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई विभागीय शाखा लातुर यांचेकडुन दंडाची रक्कम रूपये १०,०००/- (अक्षरी दहा हजार) एवढी रक्कम दि. २५-०५-२०१७ रोजी चलनाने शासन खाती भरणा केलेली आहे.

(७) तसेच शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमजबजावणी संदर्भात वेळेवर मालाचा पुरवठा होणे, मालाचा दर्जा सुधारणे, स्वच्छता तसेच बोगस विद्यार्थी संख्या दाखवून शालेय पोषण आहारातील गैरव्यवहार व अनियमितता थांबविणेसाठी शिक्षण विभागामार्फत होणा-या पटपडताळणी मध्ये दर्शविण्यात आलेल्या पटसंख्येनुसारच शा.पो.आ. योजनेची तांदुळ व धान्यादी मालाची मागणी तसेच इंधन व ऑनलाईन माहिती नुसारच तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी/अधिक्षक शालेय पोषण आहार यांचेकडून तपासणी झाल्यानंतर जिल्हा स्तरावरून शाळेच्या बँक खात्यावर अदाई करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-**

(१) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी नियुक्त पुरवठेदाराने धान्य पुरवठा करणा-या वाहनामध्ये वजनकाटा ठेवण्याची तरतूद करारनाम्यामध्ये नमूद आहे. त्यानुसार शाळांना धान्य वजन करून दिले जाते. वजनाची खात्री धान्य स्विकारणा-या मुख्याध्यापकावर निश्चित केली आहे. वजनामध्ये तफवत आढळल्यास धान्य न स्विकारण्याबाबत मुख्याध्यापकास अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचा आहार मिळावा यासाठी तांदूळ व धान्यादी मालाची सुव्यवस्थित साठवणूक,आहार शिजवताना घ्यावयाची काळजी, परिसरातील स्वच्छता इ. बाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांचेमार्फत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. शाळांना पुरवठा झालेले अन्न धान्य सुरक्षित राहण्यासाठी कोठया उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दररोज दोन पालकांनी शाळेत उपस्थित राहून शालेय पोषण आहाराच्या दर्जाबाबत पाहणी करून चव घ्यावी व त्याची नोंद चव रजिस्टरवर घेण्यात यावी, अशी तरतूद आहे. यासोबत, पुरवठयासंदर्भात अथवा आहाराच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास पालकांनी त्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांना SMS द्वारे माहिती दयावी व त्यासाठी प्रत्येक शाळेने तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांचा मोबाईल नंबर स्पष्ट दिसू शकेल अशारितीने शाळेच्या दर्शनी भागात लिहावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. शालेय पोषण आहार योजनांतर्गत पूरविण्यात येणा-या अन्नाचा दर्जा शासन मान्य प्रयोगशाळेतून तपासून घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शालेय पोषण आहार योजनेतंर्गत पात्र शाळांतील विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक सरल प्रणालीला जोडण्यात आले आहेत. सदर प्रमाणे कार्यवाही भविष्यात १०० टक्के पूर्ण होईल. तसेच, Automated Monitoring System लागू करण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार शासनाने NIC च्या मदतीने याबाबत प्रणाली विकासीत केली आहे. सदर प्रणालीच्या माध्यमातून दररोज सर्व पात्र शाळांनी ऑनलाईन पद्धतीने माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच, याबाबतची माहिती एसएमएस/मोबाईल ॲप/ इंटरनेटद्वारे पाठविणे आवश्यक आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने करजखेडा ता.जि.उस्मानाबाद जिल्हा परिषेद शाळेला भेट दिल्यानंतर धान्याची पोती अर्ध्यापेक्षा कमी आढळून आले होते तसेच धान्याचे वजन करण्यासाठी काट्याचा उपयोग केला जातो काय, त्याचप्रमाणे बंधपत्रामध्ये अटी व शर्ती असताना चौकशी केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जिल्हा परिषद आणि खाजगी अनुदानित शाळा अशा एकूण १५३८ संस्थांना पुरवठादार संस्था महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमरर्स फेडरेशन लिमिटेड मुंबई विभागीय शाखा करते.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, पुरवठादारासोबत जो करारनामा केलेला आहे त्याची प्रत मुख्याध्यापकांजवळ आहे काय, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, शालेय पोषण आहाराच्या संदर्भात ज्या नोंदवह्या दिल्या जातात त्याच्या मागच्या बाजूला करारनाम्याची प्रत छापून दिलेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ७० टक्के करारनाम्याची अंमलबजावणी शाळेपर्यंत करायची आहे. त्यामध्ये तुम्ही १ ते ४२ पर्यंत अटी व शर्ती घातलेल्या आहेत आणि याची ७० टक्के अंमलबजावणी ही शाळेवर करायची आहे आणि त्या मुख्याध्यापकाला करारनाम्याची कोणतीही जाणीव नाही. मुख्याध्यापकांशिवाय गटविकास अधिकारी आणि गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे सुध्दा करारनाम्याच्या प्रत नाहीत. यासर्व गोष्टी दौ-यांच्या निमित्ताने समितीसमोर आल्या आहेत. पण यामध्ये बदल व्हावा एवढीच समितीची विनंती आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, नोंदवहीसोबत जर करारनामा जोडून दिला असेल तर आता यासंबंधातील परिपत्रक निर्गमित करावे. कारण विभागाने/जिल्हा परिषदेने पाठविलेली प्रत कदाचित संबंधितांनी वाचली नसावी. विभागाच्या असे लक्षात आणून देण्यात येते की, शाळांसाठी असलेले करारनामे मराठीमध्ये आणि अंगणवाडी सेविकांसाठी करारनामे हे इंग्रजीमध्ये आहेत. तसेच समिती शाळांना भेटी देते तेव्हा अनेकठिकाणी वजन काटे दिसून येत नाहीत.

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस पुढील प्रमाणे माहिती दिली की, पुरवठादार मालाची वाहतुक करणा-या वाहनात प्रमाणित वजनकाटा ठेवेल व प्रत्यक्ष माल गावातील शालेय व्यवस्थापन समिती, सुजान व्यक्ती, पालक, आहार शिजवणारी यंत्रणा, बचत गट यांच्यासमोर वजन करुन देतील व तसे केल्याबद्दल मुख्याध्यापकाची बचतगटाची पोहोच घेतील. यांनतर समितीने असे निदेश दिले की, या करारनाम्यामध्ये अटी व शर्ती देऊन आपण सर्व लिहिलेले आहे. पण हा करारनामा जुना आहे. नवीन करारनाम्याप्रमाणे वजन करुन आपण सर्व नोंदवून घेतले पाहिजे. याप्रमाणे सर्व बाबी त्यात अंतर्भूत करुन तशा पध्दतीचा करारनामा त्यांना पाठविला पाहिजे. यावर समितीने असे निदेश दिले की, यासाठी जागृती निर्माण करुन तालुका पातळीवर मेळावे घेण्यात यावे तसेच आपल्यामा ध्यमातून एखाद्या विषयावर जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीमध्ये धडक कारवाई झाली तर त्यात व्यवस्थित यंत्रणा निर्माण होईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे 'शालेय पोषण आहार कार्यक्रम' योजनेच्या संदर्भात समितीने करजखेडा जिल्हा परिषद शाळेला भेट दिली होती. त्याअनुषंगाने घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, करजखेडा जिल्हा परिषद शाळेतील धान्याची पोती अर्ध्यापेक्षा कमी असल्याचे आढळून आले होते. तसेच धांन्याचे वजन करण्यासाठी मुलांच्या वजन करण्याच्या काट्याचा उपयोग केला जात असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे पुरवठादारासमवेत केलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक ७ नुसार वाहनामध्ये प्रमाणित वजन काटा ठेवलेला असला तरी पुरवठादाराने प्रत्येक शाळेमध्ये वजन काटा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**शालेय पोषण आहाराचा पुरवठादार हा राज्य स्तरावरुन निश्चित होतो. अटी व शर्तीनुसार पुरवठादारांकडून बंधपत्र करुन घेण्यात येत असले तरी पुरवठादाराने चुकीच्या पध्दतीने पुरवठा केल्यास पुरवठादारास काळ्या यादीत टाकण्यात यावे. उपस्थितीनुसार तांदुळ मागविला जात असतो पण बहुतांश वेळेला यामध्ये गैरव्यवहार होत असतो. धांन्यादी मालाच्या देयकासोबत पुरवठा करण्यात आलेला तांदुळ व धांन्यादी माल मागणी प्रमाणे व योग्य वजनाचा प्राप्त झाल्याबाबत सर्व गट शिक्षणाधिकारी/अधिक्षक वर्ग-२ शालेय पोषण आहार पंचायत समिती यांच्या स्वाक्षरीने प्रमाणपत्र सादर करण्यात येते.**

धांन्यादी व तांदुळ पुरवठा करीत असताना नोंदवही सोबत जर करारनामा जोडून दिला असेल तर यासंबंधातील परिपत्रक निर्गमित करावे, **शाळांसाठी असलेले करारनामे मराठीमध्ये आहेत आणि अंगणवाडी सेविकांसाठी असलेले करारनामे इंग्रजीमध्ये आहेत, त्यामुळे अंगणवाडी सेविकांनादेखील मराठीमध्ये करारनामे उपलब्ध करुन देण्यात यावेत. पुरवठादाराने प्रत्येक शाळेमध्ये वजनकाटा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व पुरवठादाराने संबंधित शाळेत केलेला धांन्यादी व तांदुळ पुरवठा देयकाप्रमाणे आहे किंवा कसे याकरिता वजन तपासण्यासाठी जिल्हा परिषदेने भरारी पथक नेमावे.**

करजखेडा, ता.जि.उस्मानाबाद येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली असता धांन्याची पोती अर्ध्यापेक्षा कमी आढळून आलेली होती, या आक्षेपानुसार पुरवठादार महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई विभागीय शाखा, लातुर यांचेकडून रुपये १०,०००/- एवढी रक्कम दिनांक २५ मे, २०१७ रोजी चलनाने शासन खाती भरणा केलेली आहे. त्याअर्थी, पुरवठादार सकृतदर्शनी दोषी असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे संबंधित पुरवठादारास काळ्या यादीत टाकण्यात यावे. तसेच **पुरवठादारासमवेत केलेल्या करारनाम्याची ७० टक्के अंमलबजावणी संबंधित शाळेने करायची आहे, त्यामुळे शाळेच्या मुख्याध्यापकांनी या करारनाम्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होणेसाठी दक्षता घ्यावी. मुख्याध्यापकांशिवाय गट विकास अधिकारी आणि गट शिक्षणाधिकारी यांना देखील करारनाम्याच्या अटी व शर्ती बाबतची माहिती असणे आवश्यक आहे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

# प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### पंचायत समिती, वाशी अंतर्गत ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण करण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतींच्या लेखापरिक्षणाची आजमितीस काय परिस्थिती आहे. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायतींचे लेखापरिक्षण पूर्ण झालेले आहे. ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध नसलेल्या २० ग्रामपंचायती होत्या. यातील दोन ग्रामपंचायती गोरगाव आणि पारडीमध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. ६ ग्रामपंचायतीचे अभिलेखे नंतर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत ३ ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध आहेत. ज्या ग्रामसेवकांनी अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाही, अशा ग्रामसेवकांना नोटीसेस बजाविण्यात आलेल्या आहेत. अशा ग्रामसेवकांवर २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आलेला आहे आणि त्याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेतलेली आहे.

लेखापरिक्षणाचे वेळी हा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर पंचायती राज समितीच्या माध्यमातून त्यावर चर्चा केली जाते. याकरीता जिल्ह्यात पंचायती राज समिती अभ्यास दौ-याच्या निमित्ताने येत असते. अनेक ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण पूर्ण झालेले नाही आणि ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे सदरहू विषय विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी उपस्थित करण्यात यावा. तसेच कोणत्या वर्षापासून ग्रामपंचायातीचे लेखापरिक्षण झालेले नाही याबाबत समितीस माहिती द्यावी अशी समितीने विचारणा केली असता गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २००८-२००९ पासून २० ग्रामपंचायतींचे लेखापरिक्षण झालेले नाही.

तद्नंतर समितीने ग्रामपंचायतीने दोन महिन्याच्या आत ऑडिट पूर्ण करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व लेखापरिक्षण पूर्ण करुन घेतल्यानंतर त्यासंदर्भातील अहवाल समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा अशी सूचना केली आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, वाशी अंतर्गत जे ग्रामसेवक अभिलेखे उपलब्ध करून देऊ शकले नाहीत त्यांना समितीच्या निर्देशानुसार २५,००० रूपयांचा दंड ठोठावून त्याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात नोंदी घेतल्या आहेत काय ? तसेच अनेक ग्रामपंचायतींचे लेखापरिक्षण पूर्ण झालेले नसल्याचे समितीस आढळून आले आहे. सदरहू लेखापरिक्षण पूर्ण करण्यासंदर्भात विभागाने व जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, वाशी अंतर्गत २० ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण होणे बाकी होते. सदरील २० ग्रामपंचायतींच्या प्रलंबित घटकांचे लेखा परिक्षण सद्यस्थितीत पूर्ण करण्यात आलेले आहे.

ज्या ग्रामसेवकांनी सन २०११-२०१२ मध्ये लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नव्हते अशा ६ ग्रामसेवकांना रू.२५,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात आलेला असून रू.१,५०,०००/- वसूल करण्यात आलेले आहेत. उर्वरित १७ ग्रामसेवकांची प्रकरणे सन २०११-२०१२ पूर्वीची असल्याने यांचेकडून प्रती रूपये १००/- प्रमाणे रूपये १,७००/- रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे एकूण रक्कम रू.१,५१,७००/- शासनखाती भरणा करण्यात आलेली आळे. १ ग्रामसेवक मयत आहे. कार्यवाही करावयाच्या एकूण २४ ग्रामसेवकांपैकी १४ ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ या कार्यालयाचे आदेश क्र.जा.क्र. पंसवा/पंचायत-३/कावी/१७२/१७ दि.३०-०६-२०१७ अन्वये करण्यात आलेली असून त्या बाबतची नोंद संबंधितांच्या मूळ सेवा पुस्तिकेत घेण्यात आलेली आहे. तर १ ग्रामसेवक मयत असल्याने व ९ ग्रामसेवक सेवानिवृत्त असल्याने वेतनवाढ थोपविण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

#### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

#### अभिप्राय व शिफारशी

समितीने पंचायत समिती वाशी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे भेट देऊन सुमारे २० ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण अपूर्ण असल्याचे व त्यात अनेक ग्रामसेवकांनी कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. समितीने जिल्हा परिषदेला निदेश देऊन या प्रकरणी लेखा परिक्षण पूर्ण करुन त्याचा अहवाल समितीस पूर्ण करण्याचे कळविले होते. सदरचा अहवाल पाठविला असतांना या जिल्हा परिषदांचे लेखा परिक्षण केले नसल्याचे व त्यामुळे ज्या सर्व संबंधित ग्रामसेवकांनी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा सर्व संबंधित ग्रामसेवकांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई केली व त्यांची

एक तात्पुरती वेतनवाढ थांबविली असल्याचे समितीला सांगितले. या बाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापि, संबंधित ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण झालेले नसल्याने या ग्राम पंचायतीमध्ये एकूण किती निधी अडकला, कोणकोणत्या प्रकारची कागदपत्रे ठेवली नाहीत, योजना राबविल्या किंवा कशा याचा उल्लेख केला गेला नाही. त्यामुळे या संदर्भात समिती अत्यंत दक्ष असून कोणत्याही परिस्थितीत संबंधित योजनेसाठी निर्देश केलेला निधी खर्च होणे आवश्यक असताना कागदपत्रेच उपलब्ध करुन दिली नाही म्हणून केवळ दंडात्मक कारवाई न करता या सर्व ग्रामसेवकांवर प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक असल्याचे समितीला वाटते. म्हणून या **सर्व ग्रामपंचायतीमध्ये एकूण किती योजनांच्या बाबतीत लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत त्याची तपासणी करुन या सर्व संबंधित ग्रामसेवकांची प्राथमिक चौकशी करुन त्यांचेकडून या संदर्भात खुलाशे घेऊन व या लेखा परिक्षणामध्ये अपहार आढळून आल्यास त्यांची विभागीय चौकशी करुन दोषी आढळून आल्यास त्यांचेविरुध्द नियमानुसार गंभीर स्वरुपाची कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### शालेय आरोग्य तपासणीबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती क्षेत्रातील किती शाळांतील व कोणत्या वर्गातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली, त्यात कोणकोणते दोष आढळून आले, उर्वरित विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी न होण्याची कारणे काय आहेत, व त्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली.

यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, तुळजापुर यांनी समितीस विदित केले की, सन २०१२-१३ मध्ये पंचायत समिती क्षेत्रातील २४९ शाळापैकी २४९ शाळांची इयत्ता १ ते १० वीच्या वर्गातील एकूण विद्यार्थी संख्या ३४,७३९ विद्यार्थ्यांपैकी ३४,३०४ विद्यार्थ्यांची शाळामध्ये आरोग्य तपासणी करण्यात आली. फेर तपासणीनंतर उर्वरित गैरहजर ४३५ विद्यार्थ्यांची तपासणी केंद्रीय शाळेच्या ठिकाणी दिनांक २०-२-२०१३ ते १९.३.२०१३ या कालावधीत करण्यात आली. सदर तपासणीमध्ये २५५ विद्यार्थ्यांमध्ये पुढील प्रमाणे दोष आढळून आले.

अस्थिव्यंग-२९, नेत्रदोष-५८,वाचादोष-१८, कान, नाक, घसा-५१, अध्ययन अक्षम-०४, मतिमंद-२१, हृदयरोग- ५, जनरल सर्जरी-४१ व इतर आजाराचे २३ विद्यार्थी आढळून आले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, हृदयरोगाच्या १० विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया केली आहे परंतु २ विद्यार्थ्यांची प्रकृती आता कशी आहे.

यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, तुळजापुर यांनी समितीस विदित केले की, हृदयरोगाच्या ५ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली दोन विद्यार्थ्यांच्या पालकांनी हृदय शस्त्रक्रिया करण्यास लेखी नकार दिला होता. नकार दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याचा मृत्यू झालेला आहे. ३ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली होती त्यांची प्रकृती उत्तम आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीस्तरावर अस्थिव्यंगाचे २९ विद्यार्थी आढळून आलेले आहे. अस्थिव्यंगाचे विशेष काही कारण आहे काय, यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, तुळजापुर यांनी समितीस विदित केले की, अस्थिव्यंगाचे विशेष असे कारण नाही. हा हाडांचा रोग आहे. त्यांना वेगळया प्रकारचे शूज दिले जातात. या सर्व मुलांवर ट्रिटमेंट करण्यात आली आहे. आता मुलांमध्ये सुधारणा झालेली आहे.

तद्‌नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विदित केले की, पंचायत समितीमध्ये प्रत्येक रुग्णांची नोंद असते. अस्थिव्यंगाचे प्रमाण जन्मतःच असेल तर त्याची तपासणी करुन त्यावर तात्काळ उपचार केले जातात. सुरुवातीलाच मायनर सर्जरीने अस्थिव्यंगाचे प्रमाण कमी होऊ शकते. तात्काळ उपचार केले तर अस्थिव्यंगाचे रुग्ण बरे होऊ शकतात. अस्थिव्यंग जास्त प्रमाणात असेल तर त्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित केले जाते. अस्थिव्यंगाच्या २९ विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थ्यांची सर्जरी करण्यात आलेली आहे. ४ मुलांना शूज दिलेले आहेत. तसेच काही रुग्णांना व्हील चेअर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. अस्थिव्यंगाचे प्रमाण ज्या टक्केवारीमध्ये असेल त्या टक्केवारीनुसार त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. या प्रमाणपत्राचा उपयोग नोकरीसाठी होत असतो.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये आरोग्याच्या संदर्भात चांगली काळजी घेतली जाते. शासनाने आरोग्याच्या संदर्भात ब-याच योजना सुरु केलेल्या आहेत. केशरी व पिवळे रेशन कार्ड धारकांना यामध्ये बराच लाभ झालेला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा लाभ आपल्या जिल्हयातील फार कमी लोकांनी घेतलेला आहे. गरिबांवर ३-३ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार केले जातात. त्यामुळे या योजनेची माहिती जनतेपर्यंत जाणे आवश्यक आहे. तसेच अस्थिव्यंगाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती क्षेत्रातील शाळांतील व वर्गातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर अस्थिव्यंगाचे २९ विद्यार्थी आढळून आलेले आहेत. याबाबत समितीस चौकशी अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहे. विद्यार्थ्यांमध्ये अस्थिव्यंगाचे विशेष काही कारण आहे काय यासंदर्भात विभागाने तपासणी केली आहे काय, तसेच आरोग्य विषयक कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीचा कार्यवृत्तांताचे अवलोकन करता, याप्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले नाहीत त्यामुळे चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला नाही. अस्थिव्यंगाचे प्रमाण विद्यार्थ्यांमध्ये जास्त असल्यासंबंधीच्या कारणांची विचारणा समितीने केलेली आहे. त्यासंबंधी जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद यांचे अभिप्राय घेण्यात आले असून, त्यांचे

अभिप्रायानुसार अस्थिव्यंगाचे विशेष असे कोणतेही कारण नसून जास्तीत जास्त केसेस या मार लागल्यामुळे आहेत. तपासणीमध्ये अस्थिव्यंगाचे २९ विद्यार्थी आढळून आलेले असून त्यापैकी १३ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली त्यात १३ पैकी ७ विद्यार्थ्यांची स्पर्श रूग्णालय सास्तूर येथे तर ६ विद्यार्थ्यांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथे शस्त्रक्रिया करण्यात आली. उर्वरित १६ विद्यार्थ्यांमध्ये अस्थिव्यंगाच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता नसल्याने सदरील विद्यार्थ्यांना शालेय आरोग्य तपासणीत कार्यक्रमाअंतर्गत औषधोपचार देण्यात आले आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-**

अस्थिव्यंगाच्या जास्त केसेस ह्या मार लागल्यामुळे आहेत. तपासणीमध्ये अस्थिव्यंगाचे २९ विद्यार्थी आढळून आलेले असून १३ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. या १३ पैकी ७ विद्यार्थ्यांवर स्पर्श रूग्णालय सास्तूर येथे तर उर्वरित ६ विद्यार्थ्यांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथे शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच उर्वरित १६ विद्यार्थ्यांमध्ये अस्थिव्यंगाच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता नसल्याने सदरील विद्यार्थ्यांना शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत औषधोपचार करण्यात आलेले आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, उपरोक्त अस्थिव्यंगाच्या २९ प्रकरणांमध्ये कारवाई झालेली असून १३ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे व उर्वरित १६ रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता नसल्याने सदरील विद्यार्थ्यांना शालेय आरोग्य तपासणीत कार्यक्रमांतर्गत औषधोपचार देण्यात आले आहेत.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, हृदयविकाराच्या रुग्णांना संदर्भ सेवा मिळायला हवी ती मिळत नाही. त्या कालखंडामध्ये बरीचशी प्रकरणे प्रलंबित होती. रुग्णांना संदर्भ सेवा दिलेली नाही. त्यामुळे यासदंर्भात कार्यवाही करण्यात यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस खुलासा केला की, या संबंधी कार्यवाही झालेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला भेट देऊन शालेय आरोग्य तपासणीसंदर्भात सन २०१२-१३ या अहवाल वर्षात पंचायत समिती क्षेत्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासंदर्भात माहिती घेतली असता या शाळांमध्ये अनेक विद्यार्थ्यांमध्ये दोष आढळून आल्याचे समितीला सांगितले. त्यामध्ये अस्थिव्यंग, नेत्रदोष, वाचादोष, कान, नाक, घसा, अध्ययन अक्षम, मतिमंद, हृदयरोग, जनरल सर्जरी इत्यादी आजाराचे विद्यार्थी या आरोग्य तपासणीमध्ये आढळून आल्याचे समितीने सांगितले.

हृदय रोगाच्या ५ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली, दोन विद्यार्थ्यांच्या पालकांनी हृदय शस्त्रक्रिया करण्यास लेखी नकार दिला होता. नकार दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याचा मृत्यू झालेला आहे आणि शस्त्रक्रिया केलेल्या विद्यार्थ्यांची प्रकृती उत्तम असल्याचे समितीला सांगितले. समिती ज्या ज्या वेळी जिल्हा परिषदांना भेट देत असते त्या त्या वेळी पंचायत समिती क्षेत्र शाळांमध्ये भेट देत असते व पंचायत समितीला देखील भेट देत असते. पंचायत समितीला भेट देत असताना शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा विषय अत्यंत गंभीरपणे चर्चा करीत असताना तेथे विद्यार्थ्यांना संदर्भ सेवा न मिळणे, शाळेकडून विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्यात न येणे, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वेळेवर होत नसणे, काही गैरहजर विद्यार्थ्यांच्यादेखील तपासणीचा पाठपुरावा करण्यात न येणे इत्यादी बाबी आढळून आल्या आहेत. विशेषतः अस्थिव्यंग, नेत्रदोष, वाचादोष, कान, नाक, घसा, अध्ययन अक्षम, मतिमंद, हृदयरोग, जनरल सर्जरी इत्यादी रुग्णांची गंभीरपणे तपासणी करण्यात येऊन त्यांना संदर्भ सेवा देण्याबाबतचे धोरण शासनाने संबंधित अधिका-यांद्वारे राबविण्याबाबत शासन निर्णय असताना याबाबत आरोग्य विभागाच्या अधिका-यांकडून प्रचंड हेळसांड करण्यात येते व विद्यार्थ्यांचा आरोग्यसंदर्भात अत्यंत उदासिनता संबंधित अधिका-यामध्ये दिसून येते. यामध्ये शालेय शिक्षण, ग्रामविकास व आरोग्य विभाग या सर्वांचा समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु या प्रसंगी या तिन्ही विभागामध्ये जिल्हा परिषदेसमवेत समन्वय असल्याचे समितीस आढळून येत नाही व त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीत दोष आढळून येतात. **विशेषतः मुलांची आरोग्य तपासणी करण्याबाबत काळजी घेणे आवश्यक असताना तशी ती संबंधितांकडून घेतली जात नाही, असे समितीला दिसून येते. सबब, याद्वारे आरोग्य विभागाने संबंधित अधिका-यांनी विद्यार्थ्यांची तपासणी नियमित करण्यासंदर्भात व त्यासंदर्भात एक सर्वंकष धोरण आखून तसा शासन निर्णय त्वरित निर्गमित करावा व कोणत्याही परिस्थितीत शाळा सुरु झाल्यापासून संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांची नियमित व काटेकोर तपासणी करण्यासंदर्भात सूचना देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

## प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारती बांधण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस असा खुलासा केला की, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रासाठी जागा मिळण्यासाठी खूप अडचणी येत आहेत. २२ नवीन उपकेंद्रे मंजूर झालेली आहेत. याठिकाणी

१० टक्के जागा अजून उपलब्ध झालेली नाही. शासन निर्णयात "मोफत जागा उपलब्ध करुन द्यावी" असे नमूद केलेले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यासाठी जवळ जवळ ५ कोटी रुपयांचा खर्च येतो. तीन ते चार जागेच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला तर आपल्याला मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध होणार आहे. यासंदर्भातील इत्यंभूत माहिती माननीय पालक मंत्र्यांना दिलेली आहे.

यावर समितीने या विषयासंबंधी सचिवांची साक्ष घेण्यात येईल त्यावेळी हा विषय चर्चेला घेण्यात यावा असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

उस्मानाबाद जिल्ह्यात २२ नवीन उपकेंद्रे मंजुर झालेली असून प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रासाठी जागा मिळण्यात अडचणी येत असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली असून प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधण्यासाठी शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा.पंचायत राज समितीने प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारती बांधकामाबाबत मा.प्रधान सचिव यांचे साक्षीकरिता विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर खालील प्रमाणे आहे.

शासन निर्णय दिनांक १७-१-२०१३ व ९ जून, २०१४ अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यात ०३ प्राथमिक आरोग्य केंद्र व २२ आरोग्य उपकेंद्र बृहत आराखड्यामध्ये मंजूर करण्यात आले आहे. ते खालील प्रमाणे आहेत.

**प्राथमिक आरोग्य केंद्र**

१. प्राथमिक आरोग्य केंद्र डिग्गी, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद इमारत बांधकाम पूर्ण झाले आहे.

२. प्राथमिक आरोग्य केंद्र तेरखेडा ता.वाशी, इमारत बांधकाम चालू आहे.

३. प्राथमिक आरोग्य केंद्र सोनारी, ता.परंडा - जागा उपलब्ध झाली आहे.

**आरोग्य उपकेंद्र**

उक्त शासन निर्णयान्वये मंजूर २२ आरोग्य उपकेंद्रापैकी १५ उपकेंद्रास जागा उपलब्ध आहे ०७ उपकेंद्रास जागा उपलब्ध नाही. जागा उपलब्ध नसलेल्या उपकेंद्राची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. (१) | जागा उपलब्ध असलेले केंद्र (२) | अ.क्र. (३) | जागा उपलब्ध नसलेले उपकेंद्र (४) | जागा मिळण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना (५) |
|---|---|---|---|---|
| १ | भाटशिरपुराता. कळंब | १ | उपकेंद्र रांजनी, ता.कळंब | जागा नसलेल्या उपकेंद्रांना जागा उपलब्ध करून देणेकरिता जिल्हा स्तरावरून दि.८/६/२०१७ रोजी ग्रामपंचायत कार्यालयाना पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात येत आहे. |
| २ | नागरवाडी ता.कळंब | २ | रूई, ता.परंडा | |
| ३ | वाकवड, ता.भूम | ३ | आरणगाव, ता.परंडा | |
| ४ | रामपुर, ता.उमरगा | ४ | नाईक नगर, ता.उमरगा | |
| ५ | कालदेवनिबाळा, ता.उमरगा | ५ | वागदरी, ता.उमरगा | |
| ६ | जवळा (दु) ता.उस्मानाबाद | ६ | फुलवाडी, ता.तुळजापूर | |
| ७ | सोनेगाव, ता.उस्मानाबाद | ७ | निलेगाव, ता.तूळजापूर | |
| ८ | तावरजखेडा, ता.उस्मानाबाद | | | |
| ९ | शिगोली, ता.उस्मानाबाद | | | |
| १० | शेकापूर, ता.उस्मानाबाद | | | |
| ११ | तुगाव, ता.उस्मानाबाद | | | |
| १२ | वानेगाव, ता.तुळजापूर | | | |
| १३ | दहिवाडी, ता.तुळजापूर | | | |
| १४ | सास्तुर, ता.लोहारा | | | |
| १५ | नायगाव, ता.कळंब | | | |
| | एकूण .. | १५ | | |

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद उस्मानाबाद कडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-**

विभागाकडून बृहत आराखडा तयार केल्यानंतर त्यामध्ये समाविष्ट असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे यांच्या बांधकामासाठी संबंधित जिल्हा परिषदेकडून जागा उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे इमारतीचे बांधकाम जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीमधून जिल्हा परिषदेकडून करण्यात येते, त्यामुळे याबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभागाकडून अपेक्षित आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यासाठी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, २२ पैकी १५ ठिकाणी जागा उपलब्ध झाली आहे. सार्वजनिक कामासाठी जागेची मागणी करता येते. त्यासाठी जागा नियमित करता येते. या प्रकरणात ७ ठिकाणी जागा उपलब्ध नाही.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, वन विभागाची जागा असेल तर प्रक्रिया करुन ती जागा मिळवता येते. निर्वाणीकरणाच्या प्रस्तावामध्ये वन विभागाची जागा नियमित करता येते. निर्वाणीकरणाची प्रक्रिया सुरु झाली आहे काय, कोणत्या कारणामुळे तेथे जागा मिळत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ७ ग्रामपंचायतींमध्ये वन जमिनींचा संबंध नाही. गावठाणामध्ये किंवा बाजुला जमीनच उपलब्ध नाही, तेथे केवळ खाजगी जमिनी आहेत.

खाजगी जमीन संपादित करता येईल काय, गावठान विस्तार योजना हाती घेता येईल काय अशी विचारणा समितीने केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, तसे करता येईल अन्यथा तेथे जमीन देता येणार नाही. भुसंपादन करता येईल, मात्र त्याकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. ग्रामपंचायतीला जागा उपलब्ध नसल्यास जागा मिळवण्याकरीता किती निधी लागेल या करीता जिल्हा परिषदेने प्रस्ताव पाठवावा.

यावर समितीने अशी विचारणा केली की, राज्यात कोठेही गावाजवळ जागा घ्यावयाची असल्यास किंमत अधिक असणार आहे. त्याकरिता शासनाने मान्यता दिली पाहिजे. हा विषय महत्वाचा आहे. आरोग्य सुविधांचा प्रश्न संवेदनशील व महत्वाचा असल्यामुळे त्यास मान्यता दिली पाहिजे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीकरीता जागा नाही. अशा ठिकाणी खाजगी जमीन संपादित करण्याकरीता शासनाने परवानगी द्यावी व निधी उपलब्ध करुन द्यावा अशी समितीस शिफारस करीत आहे.

बांधकामासाठी निधी उपलब्ध आहे. जमिनीसाठी निधी द्यावा लागेल. सध्या कोणतीही योजना नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, शासकीय जागा उपलब्ध नाही तर आरोग्य व पाणी पुरवठा योजनेकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव मागवितो. यामध्ये जिल्हा परिषदेच्या सेसमधून देखील निधी आला पाहिजे. या निमित्ताने संपूर्ण राज्यासाठी योजना तयार होईल असे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले. यासंबंधी जिल्हा परिषदेने तात्काळ प्रस्ताव तयार करावा असे समितीने निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला भेट दिली असता या जिल्ह्यात २२ नवीन उपकेंद्र मंजूर झालेली असून प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उप केंद्रासाठी जागा मिळण्यात अडचणी येत असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. या संदर्भात तीन प्राथमिक आरोग्य केंद्र व २२ आरोग्य उप केंद्रे बृहत आराखड्यानुसार मंजूर झाली असून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डिग्गी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून तेरखेडा, ता.वाशी इमारतीचे बांधकाम चालू असून, सोनारी, ता.परांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन दिलेली बाब समितीला लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत उपलब्ध झाली. त्यानंतर २२ उपकेंद्रापैकी १५ उप केंद्रास जागा उपलब्ध झाली असून ७ उप केंद्रास जागा उपलब्ध झाली नाही व त्यासाठी जिल्हा परिषदेकडून आवश्यक ती कारवाई करण्यात येत असल्याचे समितीस विदित केले.

यावर समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता त्यात गावात खाजगी जागा उपलब्ध असल्यास त्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा उपकेंद्र बांधण्यासंदर्भात शासनाकडून परवानगी घेण्यात यावी व अशा खाजगी जागा विकत घेण्याबाबतची कारवाई सुरु करावी. त्याचप्रमाणे गावाच्या बाजूला गावठाण जमीन असल्यास तीदेखील संपादन करण्यासंदर्भात समितीने सुचविले.

लोकसंख्या वाढीबरोबरच गावाचे व ग्रामपंचायतीचे विस्तारीकरण झपाट्याने होते. अनेकांनी गावठाण किंवा गायरान जमिनीवर अतिक्रमण केल्यामुळे अशा गावांमध्ये गायरान अथवा गावठाण जमिनी उपलब्ध नाहीत, अशावेळी प्राथमिक केंद्र अथवा उपकेंद्राचे बांधकाम वर्षानुवर्षे प्रलंबित राहते, यासाठी शासनाकडून निधीदेखील मंजूर करण्यात येतो. प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा उपकेंद्राचे बांधकाम वेळेत होत नसल्यामुळे गावातील लोकांना आरोग्य सेवा मिळत नाही. त्यामुळे सदर इमारतींचे बांधकाम विलंबाने होत असल्याने इमारतीच्या बांधकामाच्या निधीत ही वाढ होत असते. याबाबी विचारात घेता प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा उप केंद्र उभारण्यासंदर्भात इमारतीसाठी जर शासकीय जमीन उपलब्ध नसेल तर संबंधित गावातील खाजगी जमिनी संपादन करण्यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यासाठी शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात यावा व त्या संदर्भात संबंधित जिल्हा परिषदांना सूचना देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, उस्मानाबाद जिल्ह्यातून मराठवाड्याला जाण्यासाठी एकमेव हायवे आहे. त्यामुळे या ठिकाणी अपघातांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे या ठिकाणी अधिक प्रमाणात ॲम्ब्युलन्ससेवा उपलब्ध असणे अतिशय गरजेचे आहे. त्यामुळे हा विषय सचिवांच्या साक्षीमध्ये अग्रक्रमाने घेतला जाईल.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या विषयाच्या अनुषंगाने यापूर्वी जिल्हा परिषदेमध्ये चर्चा झालेली होती. नॅशनल हायवेच्या आजुबाजूला असणा-या जिल्ह्याने ॲम्ब्युलन्स ठेवण्याबाबत करार झालेला आहे. राज्यस्तरावर किंवा ग्रामीण भागात जेव्हा ॲम्ब्युलन्सची गरज भासते त्यावेळी आपण ती सेवा उपलब्ध करुन देतो.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

उस्मानाबाद जिल्ह्यातून राष्ट्रीय महामार्ग जातो त्यावर अपघातांचे प्रमाण जास्त असल्यामुळे या ठिकाणी अधिक प्रमाणात रुग्णवाहीका उपलब्ध करण्यासंदर्भात विभागाने कोणती उपाययोजना केली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद अंतर्गत ४२ प्राथमिक आरोग्य केंद्राचे ठिकाणी टाटा सुमो वाहन उपलब्ध असून महामार्गावर १०८ क्रमांकाच्या १५ रुग्णवाहीका कार्यरत आहेत.

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये पारगाव ते तामलवाडी व तलमोड ते इटकळ पर्यंत राष्ट्रीय महामार्ग जातो. सदरील महामार्गावर प्राथमिक आरोग्य केंद्र पारंगाव, येरमाळा, येडशी, अणदुर, नळदुर्ग, जळकोट, येणेगुर याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असून तेथील रुग्णवाहिका कार्यरत आहेत.

(२) आपत्कालीन अत्यावश्यक सेवा अंतर्गत १०८ ची रुग्णवाहिका प्राथमिक आरोग्य केंद्र येरमाळा, येडशी, अणदुर व जळकोट या ठिकाणी कार्यरत ठेवण्यात आलेले आहे.

(३) शहरी विभाग अंतर्गत ग्रामीण रुग्णालय वाशी, उपजिल्हा रुग्णालय, तुळजापूर, उपजिल्हा रुग्णालय, उमरगा व जिल्हा सामान्य रुग्णालय, उस्मानाबाद या ठिकाणी १०८ रुग्णवाहीका कार्यरत ठेवण्यात आलेल्या आहेत.

### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

प्रस्तुत बाब सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित असून जिल्हा परिषद उस्मानाबादकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत सद्यःस्थितीत ४२ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असून या सर्व ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता रुग्णवाहीका उपलब्ध आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात पारगाव ते तामलवाडी व तलमोड ते इटकल पर्यंत राष्ट्रीय महामार्ग जातो. सदरील महामार्गावर प्राथमिक आरोग्य केंद्र, पारगाव, येरमाळा, येडशी, अणदूर, नळदूर्ग, जळकोट, येणेगुर या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी रुग्णवाहीका कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्र आपत्कालीन व वैद्यकीय सेवांतर्गत १५ ठिकाणी सन २०१४ पासून टोल फ्री क्रमांक १०८ च्या रुग्णवाहीका महामार्गावर कार्यरत आहेत. आपत्कालीन व वैद्यकीय सेवा अंतर्गत टोल फ्री क्रमांक १०८ ची रुग्णवाहीका प्राथमिक आरोग्य केंद्र येरमाळा, येडशी, अणदूर व जळकोट येथे कार्यरत ठेवण्यात आलेल्या आहेत. शहरी भागांतर्गत ग्रामीण रुग्णालय वाशी, उपजिल्हा रुग्णालय, तुळजापूर, उमरगा व जिल्हा सामान्य रुग्णालय, उस्मानाबाद या ठिकाणी टोल फ्री क्रमांक १०८ च्या रुग्णवाहीका ठेवण्यात आलेल्या आहेत. वरील रुग्णवाहीकांमार्फत प्रकल्प सुरु झाल्यापासून एकूण ३९,७६१ रुग्णांना रुग्णवाहीकेने सेवा दिलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा हा विषय असून पारगाव-वाशी-येरमाळा ही गावे हायवेवर आहेत. ट्रॉमा सेंटरची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. पारगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र तयार करण्यात यावे, ते हायवेवरील गाव आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील जी गावे आहेत तेथे अपघातांची संख्या जास्त असते. तात्काळ आरोग्य सेवा न मिळाल्यास अपघातात दगावणा-यांची संख्या बरीच असते. यामुळे पारगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र करण्यात यावे असे समितीने निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत आरोग्य उपकेंद्राच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता रुग्णवाहिका उपलब्ध आहेत का, तसेच आपत्कालीन सेवेसाठी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत इत्यादी विचारणा केली असता, समितीला सांगण्यात आले की, या जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग जात असून सदरील महामार्गावर पारंगाव, येरमाळा, येडशी, अणदुर, नळदुर्ग, जळकोट, येणेगुर या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्या ठिकाणी रुग्णवाहिका कार्यरत आहेत. तसेच आपत्कालीन अत्यावश्यक सेवा अंतर्गत १५ ठिकाणी सन २०१४ पासून १०८ च्या रुग्णवाहिका कार्यरत आहेत. आपत्कालीन अत्यावश्यक अंतर्गत टोल फ्री क्र.१०८ च्या रुग्णवाहिका संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या रुग्णवाहिकांमार्फत ३९,७६१ रुग्णांना सदरचा प्रकल्प सुरु झाल्यापासून आरोग्य सेवा दिल्या असल्याचे समितीला सांगितले. याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापि, **पारगाव-वाशी-येरमाळा ही गावे हायवेवर असून या ठिकाणी ट्रॉमा सेंटरची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांची संख्या जास्त असल्यामुळे ट्रॉमा सेंटरची उभारणी केल्यास तेथे अपघात झालेल्या व्यक्तींना त्वरेने आरोग्य सेवा मिळू शकेल व अनेकांचे प्राण वाचतील. सदर महामार्गावर प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत नसल्याने यापैकी काही ठिकाणी ट्रॉमा सेंटरची उभारणी करण्यासंदर्भात शासनाने सकारात्मक विचार करुन त्याबाबत कार्यवाही करुन समितीस तीन महिन्यात अहवाल पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत वाढीव उपकराची थकबाकी

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, तुळजापुर पंचायत समितीला सन २०१५ अखेरपर्यंत वाढीव उपकराबाबत किती व कोणत्या कालावधीची रक्कम येणे बाकी होती, त्यापैकी किती रक्कम मिळाली व ती केव्हा मिळाली.

यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१५ अखेरपर्यंत पंचायत समितीच्या वाढीव उपकराबाबत रु.२,८८,३५,०४४/- एवढी रक्कम येणे बाकी होती, त्यापैकी सन २०१५ अखेर रु.१,६८,०५,९४३/- एवढी रक्कम प्राप्त झाली. रुपये १,२०,२९,१०१/- एवढी रक्कम येणे बाकी आहे. सेसचे पैसे मिळण्याबाबत दर वर्षी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यामाध्यमातून जिल्हा परिषदेच्या स्तरावर पाठपुरावा करण्यात आला आहे.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, सेसचे पैसे मिळण्याबाबत लेखी पाठपुरावा केलेला आहे काय व कोणत्या तारखेला पाठपुरावा केला होता, तसेच मागणी असताना कमी रक्कम मिळाली हा पंचायत समितीवर अन्याय आहे. पंचायत समितीला लवकरात लवकर पैसे उपलब्ध होण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तहसिल कार्यालयाकडून शासनाकडे उपकर भरला जातो व तो आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिका-यांकडे व त्यानंतर तो जिल्हा परिषदेकडे येत असतो. विभागीय आयुक्त कार्यालयातून जिल्हा परिषदेकडे निधी येण्यास वेळ लागत असतो. तसेच हा निधी कमी जास्त प्रमाणात येत असतो. सन २०१४-१५ अखेर निधी आला नव्हता. मागच्या आठवडयात विभागीय आयुक्त कार्यालयातून निधी आलेला असून तो पंचायत समितीला पोहच केला जाईल. खरे म्हणजे सेसच्या निधीच्या संदर्भात पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

यानंरत समितीने अशी विचारणा केली की, सेसचे १.२० कोटी रुपये येणे बाकी आहे. ही फार मोठी रक्कम आहे. पंचायत समितीला ही रक्कम मिळाली तर दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी या निधीचा वापर करता येईल.

लोहारा पंचायत समितीला सन २०१५ अखेरपर्यंत वाढीव उपकराबाबत किती व कोणत्या कालावधीची रक्कम येणे बाकी होती. त्यापैकी किती रक्कम मिळाली व केव्हा मिळाली.

यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१५ अखेरपर्यंत लोहारा पंचायत समितीला वाढीव उपकरापोटी सन २०००-२००१ ते २०१४-१५ अखेर पर्यंत रुपये १,०८,२५,३४१/- येणे बाकी होते. त्यापैकी सन २०००-२००१ ते २०१४-१५ पर्यंत लोहारा पंचायत समितीला प्रत्यक्षात रुपये ५१,९९,५६३/- मिळाले असून सन २०१५ अखेर रुपये ५६,२५,७७८/- येणे बाकी होती. वाढीव उपकराची रक्कम मिळण्याबाबत तहसिलदारांना पत्र दिलेले आहे.

यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, या विषयाच्या संदर्भात गट विकास अधिका-यांना फारशी माहिती दिसत नाही. उपकराचा निधी तहसिलदार कार्यालयाकडून शासनाकडे जमा होत असतो व हा निधी शासनाकडून विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा परिषदेला येत असतो. त्यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या माध्यमातून लोकसंख्येनुसार पंचायत समितीला उपलब्ध करुन दिला जात असतो. दरवर्षी येणारी रक्कम विभागीय आयुक्तांमार्फत जिल्हा परिषदेला रिलीज होत असतो.

यानंतर समितीने पंचायत समितीला राज्य शासनाकडून वाढीव उपकराच्या माध्यमातून अजून किती रक्कम मिळणे अपेक्षित आहे अशी विचारणा केली असता, गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१५-२०१६ अखेरपर्यंत २० लाख ८० हजार ४९० रुपये मिळाले होते.

यावर समितीने असे निदेश दिले की, ब-याच पंचायत समित्यांचे सेसचे पैसे बाकी आहेत त्यामुळे सेसचे पैसे मिळण्यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली जाईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१५ अखेर पर्यंत जिल्ह्यातील सर्वच पंचायत समितीच्या वाढीव उपकराबाबत रु.८,३३,८७,२३७/- एवढी रक्कम येणे बाकी होती त्यापैकी उस्मानाबाद जिल्हा परिषदेस मार्च अखेर किती रक्कम प्राप्त झाली व २०१७ अद्याप किती रक्कम अप्राप्त आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

उस्मानाबाद जिल्हा परिषद अंतर्गत सर्व पंचायत समितींना मार्च, २०१५ अखेर रक्कम रुपये ८,३३,८७,२३७/- येणे बाकी आहे. त्यापैकी मार्च, २०१७ अखेर सर्व आठ पंचायत समित्यांना रक्कम रु.२,२३,८४,७५९/- एवढी प्राप्त झाली असून थकित येणे बाकी रक्कम रु.६,१०,०२,४७८/- येणे बाकी आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :**

वाढीव निधीची मागणी सुधारित अंदाजपत्रकात करण्यात आली असून वित्त विभागाकडून निधी प्राप्त झाल्यास वितरीत करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उपकराची रक्कम वसुल करण्यात आलेली नाही, याबाबत समितीस माहिती विशद करण्यात यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही प्रॉपर्टी नोंदणीबाबतची वाढीव उपकराची रक्कम आहे. शासनाकडे बरेच पैसे येणे बाकी आहे. यावर समितीने असे सुचित केले की, मग ती रक्कम लवकरात लवकर जिल्हा परिषदांना दिली पाहिजे. तसेच याबाबतची अंदाजपत्रकामध्ये तरतुद केलेली नसते काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अंदाजपत्रकामध्ये तरतुद केलेली असते. परंतु, आपल्याला माहिती आहे की, आता अंदाजपत्रकावर बोजा येत असल्यामुळे पैसे उपलब्ध नाही, परंतु त्याबाबत विभागाने मागणी केलेली असते.

यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामविकास विभागाने वित्त विभागाकडे निधीची मागणी करुन तो निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन द्यावा तसेच शासनाकडून जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना किती रक्कम देणे आहे याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात होकारार्थी उत्तर दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन प्रश्नावली क्रमांक २ वरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदरहू साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, तुळजापुर पंचायत समितीला सन २०१५ अखेरपर्यंत पंचायत समिती वाढीव उपकराबाबत रुपये २,८८,३५,०४४/- एवढी रक्कम येणे बाकी होती. त्यापैकी सन २०१५ अखेर रुपये १,६८,०५,९४३/- एवढी रक्कम प्राप्त झाली असून रुपये १,२०,२९,१०१/- एवढी रक्कम येणे बाकी आहे. सेसचे पैसे मिळविण्याबाबत दरवर्षी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. तहसिल कार्यालयाकडून शासनाकडे उपकर भरला जातो व तो आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिका-यांकडे व त्यानंतर तो जिल्हा परिषदेकडे येत असतो विभागीय आयुक्त कार्यालयातून जिल्हा परिषदेकडे निधी येण्यास वेळ लागत असतो.

लोहारा पंचायत समितीला सन २०१५ अखेरपर्यंत वाढीव उपकरापोटी सन २०००-२००१ ते सन २०१४-२०१५ अखेर पर्यंत रुपये १,०८,२५,३४१/- येणे बाकी होते. सन २०००-२००१ ते सन २०१४-२०१५ पर्यंत लोहारा पंचायत समितीला प्रत्यक्षात रुपये ५१,९९,५६३/- प्राप्त असून सन २०१५ अखेर रुपये ५६,२५,७७८/- रक्कम येणे बाकी होती.

सन २०१५ अखेर पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वच पंचायत समितींना मार्च, २०१५ अखेर रुपये ८,३३,८७,२३७/- एवढी रक्कम येणे बाकी आहे. त्यापैकी मार्च, २०१७ अखेर सर्व आठ पंचायत समित्यांना रुपये २,३३,८४,७५९/- एवढी रक्कम प्राप्त झाली असून थकित येणे बाकी रक्कम रुपये ६,१०,०२,४७८/- येणे बाकी आहे. जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत वाढीव उपकराची थकबाकीची रक्कम पंचायत समितीला लवकरात लवकर उपलब्ध होण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विशेष लक्ष देण्याची आवश्यक आहे.

तुळजापुर पंचायत समितीला सन २०१५ अखेरपर्यंत उपकराचे रुपये १.२० कोटी येणे बाकी आहे, ही रक्कम खुप मोठी आहे. पंचायत समितीला ही रक्कम प्राप्त झाली तर दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी या निधीचा विनियोग करता येईल.

**मार्च, २०१७ अखेर उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व आठ पंचायत समित्यांना येणे बाकी रक्कम रुपये ६,१०,०२,४७८/- एवढी आहे, ही मालमत्ता नोंदणीबाबतची वाढीव उपकराची रक्कम शासनाकडून येणे बाकी आहे. सबब, ग्रामविकास विभागाने वित्त विभागाकडे निधीची मागणी करुन तो निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करन द्यावा, तसेच शासनाकडून जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना देणे असलेल्या निधीची माहिती तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### जिल्हा परिषद उस्मानाबाद मधील अफरातफर व गैरव्यवहारात गुंतलेली रक्कम वसुल करणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, उस्मानाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत २८८ प्रकरणे सन १९९४-१९९५ पासून प्रलंबित आहेत. यामध्ये एकूण २,८४,२३,११७/- एवढी रक्कम गुंतलेली असून त्यापैकी रुपये ४५,९७,८३०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. रक्कम रुपये २,३८,२५,२८७/- एवढ्या रकमेची वसुली अद्याप व्हावयाची आहे. यामध्ये एकूण ४७७ व्यक्ती दोषी आहेत. काही प्रकरणे विभागीय चौकशी व न्यायप्रविष्ट असल्यामुळे प्रलंबित असून रकमा वसूल झालेल्या नाहीत. काही कर्मचा-यांच्या वेतनातून व निर्वाह भत्त्यातून रकमेची वसुली सुरु आहे. सर्व प्रकरणात विभागीय चौकशी, निलंबनाची व पोलिसात गुन्हे नोंद करण्याची कार्यवाही केलेली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, हा सर्व पैसा शासनाचा आहे. एवढा काळ, एवढी रक्कम प्रलंबित राहणे योग्य नाही. आपल्या जिल्ह्यात पंचायती राज समितीचा दौरा आहे हे समजल्यानंतर आपण ही रक्कम कमी करण्याचा प्रयत्न करावयास हवा होता. आपण काहीही प्रयत्न केलेला दिसून येत नाही. आपण किमान निम्मी रक्कम तरी वसूल करावयास हवी होती. त्याचप्रमाणे आपण या दोषी व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केलेली आहे, याची माहिती दिलेली नाही. २ कोटी रुपयांचा अपहार करायचा, १०-१० वर्षे ही रक्कम वापरायची आणि हप्त्याहप्त्याने फेडायची, हे बरोबर नाही. यामध्ये किती व्यक्ती दोषी असल्याचे आढळून आले व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, एकूण रक्कम दिलेली आहे व वसुल केलेली रक्कम दिलेली आहे. त्याचप्रमाणे आपण ४५ लक्ष रुपयांची वसुली केली आहे. ही रक्कम आपण कशाच्या माध्यमातून वसूल केली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शिक्षण विभागामध्ये ५ प्रकरणे होती व त्यामध्ये ५ व्यक्ती दोषी आढळून आल्या होत्या. या प्रकरणी १०,९४,३०७/- एवढी रक्कम गुंतली होती व त्यापैकी ३,९४,५४४/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. ही रक्कम संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्या पगारातून वसूल केलेली आहे.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, परांडा पंचायत समितीमध्ये ज्यांच्याकडून वसुली येणे बाकी होते असेच अधिकारी समितीला उत्तर देत होते. त्याच्या वसुलीचे देखील एक प्रकरण होते. त्याचे प्रमोशन झालेले होते. संबंधित अधिका-याला फक्त ३१० रुपये भरावयाचे होते. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस वसुलीबाबत दिरंगाई झाल्याचे मान्य केले असून दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेरपर्यंत अधिकाअधिक रक्कम वसुल केली जाणार असल्याचे आश्वासित केले आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या संदर्भातील विषय अतिशय महत्वाचा आहे. १ कोटी ४८ लाख रुपयांची अफरातफरीची रक्कम आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई आहे. खाते जोपर्यंत बंद होत नाही, तोपर्यंत नवीन योजना चालू करु शकत नाही. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योग्य ती पुढील कार्यवाही करावी, अशी सूचना आहे. खाते बद करून नवीन खाते चालू करुन ग्रामपंचायतीला लाभ कसा देता येईल अशी व्यवस्था केलेली आहे काय या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ग्रामीण पाणीपुरवठा, कार्यकारी अभियंत्यामार्फत १ कोटी ४८ लाख रुपये त्यामध्ये गुंतलेले होते. ग्रामीण पाणी पुरवठा समितीकडे रक्कम होती. त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढवून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. याबाबत आवश्यक ती माहिती शासनास अवगत केलेली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या बाबतीत गंभीर बाब आहे. यामधील अफरातफर आणि गैरव्यवहारामधील अधिकाअधिक रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. यासंदर्भातील अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा. यापूर्वी समितीने अनेक जिल्हा परिषदांना भेटी दिलेल्या आहेत. अनेक गैरव्यवहारांच्या प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल केलेला आहे. ज्या ठिकाणी शक्य असेल अशा ठिकाणी बोजा चढविलेला आहे. अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये संबंधितांकडून सक्तीची वसुली करण्याची गरज आहे. यासंदर्भातील अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, विभागीय स्तरावरील प्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी लक्ष घालून निपटारा केला पाहिजे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस पुढील प्रमाणे माहिती दिली. सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील पृष्ठ क्रमांक ५१ एक (२) मध्ये दर्शविल्यानुसार दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दहाव्या, अकराव्या व बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन १९९६-१९९७ ते १९९९-२००० या कालावधीत शासनाकडून एकूण रुपये ८,७६,००,००० इतकी रक्कम उस्मानाबाद जिल्हा परिषदेस प्राप्त झाली. पंचायत समितीनिहाय रकमा शासनाकडून प्राप्त झालेल्या नाहीत.

अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक ३०.३.२००२ ते २३.२.२००५ या कालावधीत शासनाकडून एकूण रुपये २३,१२,८१,००० इतकी रक्कम उस्मानाबाद जिल्हा परिषदेस प्राप्त झाली. पंचायत समितीनिहाय रकमा शासनाकडून प्राप्त झालेल्या नाहीत. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २००५-२००६ ते २०१०-२०११ या कालावधीत शासनाकडून एकूण रुपये ५४,६६,५२,००० इतकी रक्कम उस्मानाबाद जिल्हा परिषदेस प्राप्त झाली. जिल्हा परिषद स्तरासाठी रक्कम रुपये १४,११,६३,००० व पंचायत समिती स्तरासाठी रक्कम रुपये १३,५१,६३,००० आणि ग्रामपंचायत स्तरासाठी रक्कम रुपये २७,०३,२६,००० असे एकूण रुपये ५४,६६,५२,००० रक्कम प्राप्त झालेली आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारात संबंधातील दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत २८८ प्रकरणे प्रलंबित होती. सदर २८८ गैरव्यवहार प्रकरणात एकुण रु. २,८४,२३,११७/- इतकी रक्कम गुंतलेली असुन त्यापैकी समितीच्या साक्षीपर्यंत रक्कम रु.४५,९७,८३० इतक्या रकमेची वसुली झालेली आहे. विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत त्यापैकी रक्कम रु२,०६,८६,२६६/- इतक्या रकमेची अद्यापही वसुली झाली नसल्याची माहिती समितीस प्राप्त झाली असून सदर अफरातफर तसेच गैरव्यवहार प्रकरणात एकूण किती व्यक्ती दोषी असल्याचे आढळुन आलेले आहे. यासंदर्भात समितीने तातडीने दोषी कर्मचा-यांवर अधिका-यांवर कारवाई करण्याचे तसेच गुंतलेली रक्कम वसुल करण्याचे निदेश देऊनही त्यानुसार प्रकरणनिहाय कारवाई व वसुली न करण्याची कारणे काय ?

(२) या प्रकरणी कार्यरत विभागप्रमुख यांनी वेळेत कारवाई केली नसणे संबंधित अपचा-यावर कारवाई अथवा वसुली न करता त्यांना पाठीशी घालत आहेत, हे ही खरे आहे काय, याप्रकरणी संबंधित विभागप्रमुखावर कारवाई केली नसल्यास त्याची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदे कडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद मधील अफरातफर व गैरव्यवहारात गुंतलेल्या रकमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | अफरातफरीची एकूण प्रलंबित प्रकरणे | अफरातफर प्रकरणातील दोषी व्यक्तींची संख्या | एकूण प्रलंबित अफरातफरीची रक्कम | दि. २१-२-१६ अखेर वसुल झालेली रक्कम | दि. २१-२-१६ पासुन आजतगायत वसुल झालेली रक्कम | माहे डिसेंबर, अखेर प्रलंबित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १) | शिक्षण | ५ | ५ | १०९४३०७ | ८८१३२६ | निरंक | २१२९८१ |
| २) | ग्राम पंचायत | २५२ | ३९३ | ६५७१३५३ | २३४५१५७ | ९४९४५६ | ३२४६४४० |
| ३) | पशु संवर्धन | १ | ४ | २४९९४६ | २००३८१ | ४९५६५ | निरंक |
| ४) | आरोग्य | १ | २ | ९००८८० | ४५०४४० | निरंक | ४५०४४० |
| ५) | समाज कल्याण | १ | २ | २५४०० | २५४०० | निरंक | निरंक |
| ६) | बांधकाम | १ | ३ | २३८२६१ | १७३८४० | ६४४२१ | निरंक |
| ७) | कृषी | २ | २ | १०८४२५८ | ३७६८७८ | १२६८१५ | ५८०५६५ |
| ८) | लघुपाट बंधारे | ९ | ३७ | ३३५५२४८ | ७९१२ | निरंक | ३३४७३३६ |
| ९) | ग्रा.पा.पु. | १६ | ३४ | १४८९०९१७ | २०८१६५७ | निरंक | १२८०९२६० |
| | एकूण | २८८ | ४८२ | २८४१०५७० | ६५४२९९१ | ११२०५५७ | २०६४७०२२ |

## शिक्षण

शिक्षण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधातील दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत ५ प्रकरणात एकूण १०,९४,३०७/- इतकी रक्कम गुंतलेली असून त्यापैकी रु.८,८१,३२६/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

उर्वरीत एका प्रकरणात श्री पी.आर.तवरे मु.अ.जि.प.प्रा.शा. पिंपळा (बु.) ता.तुळजापूर यांचेवर रक्कम रु.४,०२,९८१/- अपहारीत रकमेची जबाबदारी निश्चित करुन रु.१,९०,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तथापी संबंधित हे सध्या अनाधिकृत गैरहजेरीच्या कारणावरुन निलंबित करण्यात आले असल्याने त्यांच्या निर्वाह भत्यामधून वसुली करता येत नसल्यामुळे वसुली स्थगीत आहे. संबंधितास सेवेत पुनःस्थापीत केल्यानंतर तात्काळ वसूलीची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

दोषी सहशिक्षकाविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली असून दोषी व्यक्तीकडून अपहारीत रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच कार्यरत विभाग प्रमुखाकडून संबंधित अपचारी कर्मचारी यांचेकडून वेळेत वसूलीची कार्यवाही केलेली आहे व संबंधितावर शिस्तभंगविषयक कारवाई केलेली आहे.

**ग्रामपंचायत**

मा.पंचायत राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी , २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात मा.विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत ग्रामपंचायतमध्ये सन २००१-२०१३ या कालावधीत अफरातफरीची एकूण २५२ प्रकरणे उघडकीस आली असून सदर २५२ अफरातफरीच्या प्रकरणात एकूण रुपये ६५,७१,३५३/-रूपये इतकी रक्कम गुंतलेली असून सदरील अफरातफर प्रकरणात एकूण ३९३ कर्मचारी दोषी असल्याचे निदर्शनास आले असून एकूण २५२ प्रकरणापैकी माहे डिसेंबर, २०१७ अखेर २३४ प्रकरणात रुपये ३३,२४,९१३/- इतकी रक्कम वसूल झाली असून ३२,४६,४४०/- वसूल होणे बाकी आहे.

**पशुसंवर्धन**

पशुसंवर्धन विभागाच्या पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती तुळजापूर या कार्यालया अंतर्गत एकूण अपहारित रक्कम २,४९,९४६/- एवढी होती. सदर प्रकरणात ०३ अधिकारी व १ कर्मचारी गुंतलेला असून संबंधित अधिकारी / कर्मचा-याकडून अपहारीत रक्कम रु.२,४९,९४६/- वसुल करुन चलनाने शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. (चलन क्र.४३, दि. ०९-०७-२०१० चलन क्र. ५५ दि. १३-०७-२०१०, चलन क्र.७६, दि. १५-०७-२०१० व चलन क्र.११, दि. ०५-०१-२०१८), सद्यस्थितीत अपहारीत रक्कम निरंह आहे.

**आरोग्य**

प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा (नि) ता.परांडा येथील उक्त प्रकरण असून लेखा पडताळणी अहवाल दिनांक ०६-०८-२००१ प्राप्त झाला असून त्यानुसार संबंधित दोषी असलेले श्री.एस.डब्ल्यु सौदागर आरोग्य सेवक व डॉ.आर.टी.जाधव वैद्यकीय अधिकारी यांचेविरुध्द दिनांक ०७-०६-२००२ अन्वये पोलीस गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा.अप्पर विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे न्यायालयातील आदेश दिनांक २८-०५-२००८ अन्वये दोषी असलेल्या दोन व्यक्तीकडून वसुलीचे आदेश आहेत. त्याप्रमाणे श्री.सौदागर आरोग्य सेवक यांचे वेतनातुन दरमहा २५ टक्के प्रमाणे रुपये ४५०४४०/- वसुल करण्यात आलेली आहे. श्री.एस.डब्ल्यु.सौदागर आरोग्य सेवक यांच्याकडून १०० टक्के वसुल करण्यात आली आहे. तसेच दोषी असलेल्या दोन कर्मचा-यांपैकी या कार्यालयाच्या अधिनिस्त असलेले श्री.सौदागर, आरोग्य सेवक यांना जि.प.सेवेतुन बडतर्फ करण्यात येवून अपहारीत रक्कम वसुलीचे आदेशीत करण्यात आले होते. श्री.एस.डब्ल्यू.सौदागर, आरोग्य सेवक यांनी मा.अप्पर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे न्यायालयात अपील केल्यामुळे व मा.अप्पर विभागीय आयुक्त यांनी सदर प्रकरणात दिलेल्या निर्णयाप्रमाणे संबंधितास आरोग्य सेवक वेतन श्रेणी ४०००-६००० वरुन पदावन्नत करुन कनिष्ठ सहाय्यक या पदाची वेतनश्रेणी रु.३०५०-४५९० मध्ये पदस्थापना करण्यात आली आहे.

उर्वरित रक्कम रुपये ४,५०४४०/- इतकी रक्कम वसुलीसाठी दोषी असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचेविरुध्द दोषारोप पत्र जा.क्र.जिपउ/साप्रवि/ने-५/कावि/१४१४/२००२ दिनांक १४-११-२००२ अन्वये दोषारोप पत्र शासनास सादर करण्यात आलेले आहे. सदर प्रकरण जिल्हा न्यायालय उस्मानाबाद येथे प्रकरण क्रमांक १५८/२००३ अन्वये न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.आर टी जाधव, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा नि ता.परंडा यांच्याकडील वसुल पात्र रक्कमात वसुली संदर्भात या कार्यालयातुन पुढील पत्रानुसार पाठपुरावा केलेला आहे.

(१) या कार्यालयाचे पत्र/जाक्र/जिपउ/आवि/आस्था-१/कावि/३१०२-०५/१५ दिनांक १३-७-२०१५, ५-८-२०१५, ५-१०-२०१५, ३-१२-२०१५, ५-१-२०१६, १४-१-२०१६, १-२-२०१६, २८-४-२०१६, ५-७-२०१६, १५-११-२०१६ वरील पत्रानुसार कळविण्यात आले आहे. डॉ.आर.टी.जाधव हे दिनांक ३१-७-२००८ रोजी सेवा निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे डॉ.आर टी जाधव यांच्याकडील रक्कम सद्यःस्थितीत वसुल झालेली नाही. सदर प्रकरणात संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी चालु असुन प्रकरण जिल्हा न्यायालय उस्मानाबाद येथे न्यायप्रविष्ठ आहे.

न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर प्रकरणात वसुली संदर्भातील कार्यवाही अनुसरण्यात येत आहे. संबंधिताच्या स्थावर / जंगम मालमत्तेवर आर.आर.सी.ची कार्यवाही करण्याचे विचाराधीन आहे.

**समाजकल्याण**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागात अफरातफर तसेच गैरव्यवहार संबंधातील दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंत फक्त ०१ प्रकरण प्रलंबित होते. सदर प्रकरणात एकुण रक्कम रुपये २५४००/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी समितीचे साक्षीपर्यंत संपुर्ण वसुली झालेली आहे.

सदर अफरातफर तसेच गैरव्यवहार प्रकरणात एकुण (०२) व्यक्ती दोषी असल्याचे आढळून आले आहे. सदर गैरव्यवहाराचे प्रकरण सन २००३-२००४ मधील असुन शासकीय वसतीगृहे राज्य शासनाकडील आहेत. सदर वसतिगृहे हे शासन पत्र दिनांक ०१ जुलै, २००४ नुसार राज्य शासनाकडे हस्तांतरीत झाले आहे.

या प्रकरणात श्री आघाव पी.एन.तात्कालीन गृहपाल शासकीय वसतीगृह कळंब यांचेकडून अपहारीत रक्कम रुपये २१६००/- वसूल करुन चलन दिनांक २७-०२-२०१५ अन्वये शासन खाती भरणा केले आहे.

तसेच श्री.गोंधळे एस.जे.तात्कालीन गृहपाल शासकीय वसतीगृह नळदुर्ग यांचेकडून अपहारीत रक्कम रुपये ३८००/- वसूल करुन दिनांक ०८-०६-२०१० रोजी चलनाद्वारे शासन खाती जमा केले आहे.

सदर कर्मचारी राज्य शासनाकडे वर्ग झाले असल्याने त्यांच्यावर कार्यवाही अनुसरणे करीता मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांना सदर प्रकरणाच्या अनुषंगाने लेखा आक्षेप व चलनाच्या प्रतीसह संबधीतावर पुढील योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव पत्र क्र.३३ दिनांक ०८-०१-२०१८ अन्वये मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांना पाठविण्यात आला आहे.

**बांधकाम**

वसुलपात्र रक्कम निरंक आहे.

**कृषि**

(१) कृषि विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंत २ प्रकरणे प्रलंबित होती. सदर गैरव्यवहार प्रकरणात एकुण १०,८४,२५८ इतकी रक्कम गुंतलेली असुन त्यापैकी समिती साक्ष होईपर्यंत रु.७०७,३८०/- वसुल होणे बाकी होती. समिती साक्ष झाल्यानंतर रु.१,२६,८१५/- रक्कम संबंधीताकडून वसुल करुन शासन खाती जमा केलेली आहे.

(२) अफरातफर व गैरव्यवहार प्रकरणात दोन व्यक्ती दोषी असल्याचे निदशनास आलेले आहे. संबंधित दोषी कर्मचा-यांना सेवेतुन निलंबित करुन रक्कम तात्काळ भरणा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री.खरपुडे यांनी पुर्ण रकमेचा भरणा केलेला आहे. परंतु एस.डी.गायकवाड क.स.यांनी रक्कम भरणा न केल्याने त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.जिपउ/साप्रवि/ नं.६/ १०४४१०४९/२०१६, दि. ३०-०३-२०१६ अन्वये जि.प.सेवेतुन बडतर्फ केले आहे. तसेच त्यांच्याकडे प्रलंबित असलेली रक्कम वसुल करण्यासाठी त्यांच्या स्थावर मालमत्तेची माहिती संबंधीत गावचे ग्रामसेवक, तलाठी कोराळ व मुख्याधिकारी नगर परिषद उमरगा यांचेकडून मागवली होती. परंतु संबंधिताच्या नावे कोणत्याही स्वरुपाची मालमत्ता नसलेबाबत माहिती प्राप्त झालेली आहे. श्री.एस.डी.गायकवाड यांना सेवेतुन बडतर्फ केले असल्यामुळे त्यांना सेवा निवृत्तीचे कोणतेही लाभ अनुज्ञेय नाहीत. त्यामुळे रक्कम रु.५,८०,५६५/- वसुल होणे बाकी आहे. श्री.एस.डी.गायकवाड यांच्या भ.नि.नि.खाते क्र. A१९८४ मध्ये रु.९०४६७/-इतकी रक्कम जमा असुन सदर रक्कम त्यांच्या स्वाक्षरी शिवाय आहरण करता येत नाही.

अपहार प्रकरणी संबंधीताविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे नोंद करण्यात आले असुन प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. जिल्हा परिषदेने संबंधिताकडुन रक्कम वसुल करण्यासाठी वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे. त्यामध्ये कसल्याही स्वरुपाचा कसुर केलेला नाही.

**लघुपाटबंधारे**

लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण ०९ गैरव्यवहाराची प्रकरणे असुन सदर प्रकरणामध्ये एकुण ३७ अधिकारी /कर्मचारी यांचा समावेश आहे. संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर अपहारीत रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर चौकशीचा निर्णय झालेला नाही. सदर प्रकरणे वरिष्ठ कार्यालयात प्रलंबित आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | शासनस्तर- | १ |
| २. | विभागीय आयुक्त- | ३ |
| ३. | अप्पर जिल्हाधिकारी- | १ |
| ४. | अधिक्षक अभियंता- | १ |
| ५. | मा.न्यायालय- | ३ |
| | एकूण . . | ०९ |

सदरचे प्रकरण सन १९९४-९५ असून गैरव्यवहार प्रकरणातील १२ अधिकारी /कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यापैकी १८ अधिकारी यांचे इतर जिल्ह्यामध्ये स्थलांतर झालेले आहे. ते सध्या कोठे कार्यरत आहेत याचा शोध घेणेचे काम चालू आहे. त्यामधील दोन अधिकारी मयत आहेत. सध्या गैरव्यवहार अपहार प्रकरणातील एकूण ४ शाखा अभियंता कार्यरत आहेत. त्यांच्यावर निश्चित केलेल्या निलंबन निधीनुसार दरमहा वेतनातुन समान हप्त्यामध्ये वसुलीची कार्यवाही करणेबाबत दिनांक ०८/०८/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आलेला आहे. खुलासा प्राप्त होताच वसुलीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ग्रामीण पाणी पुरवठा**

(१) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादकडे जलस्वराज्य प्रकल्प मधील अपहार

झालेल्या पाणी पुरवठा योजनामधील एकुण १६ प्रकरणे आहेत त्यामध्ये रु.१,४८,९०,९१७/- इतकी रक्कम गुंतलेली असुन त्यापैकी रक्कम रुपये २०,८१,६६७/- वसुल झालेली आहे व उर्वरित रक्कम रु.१,२८,०९,२०६/- इतकी वसुल बाकी आहे. वसुलीसाठी संबंधिताच्या ७/१२ वर बोजा चढविणे साठी संबंधित तालुक्याचे तहसीलदार यांना पत्र देण्यात आले आहेत व काही तहसीलदार यांनी ७/१२ वर बोजा चढविला आहे व काही तहसीलदार यांनी ७/१२ वर बोजा चढविणेबाबत मा.न्यायालयाकडून स्थगिती आल्याचे या कार्यालयास कळविले आहे. तसेच अफरातफर व गैरव्यवहारच्या प्रकरणी १६ गावच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष/ सचिव अशा ३४ व्यक्तींविरुध्द पोलीस गुन्हा दाखल केलेला असुन पोलीस चौकशी होऊन चार्जशिट मा.न्यायालयात सादर करण्यात आले असुन तारखा चालु आहेत. सदरील प्रकरणे सद्यःस्थितीत न्याय प्रविष्ठ आहेत. तरी न्यायालयाच्या निकाला नंतर कार्यवाही अनुसरण्यात येईल.

(२) प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन विभाग प्रमुखानी त्या त्या वेळी कार्यवाही केली असुन संबंधितावर गुन्हे दाखल केलेले आहेत व रु.२०,८१,६६७/-रक्कम वसुल केली आहे. उर्वरित वसुली प्रकरणे न्याय प्रविष्ठ असल्याने अंतिम निर्णयानंतर वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय : (वित्त -९) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी केलेल्या कार्यवाही बाबत सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहाराची दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत २८८ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये एकुण २,८४,२३,११७/- रुपये इतकी रक्कम गुंतलेली असून त्यापैकी केवळ ४५,९७,८३०/- रुपये वसुल करण्यात आले आहेत. म्हणजे अजूनही जवळपास २.५ कोटी रुपये वसुल करावयाचे राहिलेले आहेत. सदर रक्कम वसुल करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रकमेवर व्याज अनुज्ञेय नाही काय, व्याजाची रक्कम

अनुज्ञेय असताना लेखी उत्तरात व्याजाचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सर्व प्रकरणांचा विभागनिहाय आढावा घेतलेला आहे. वसुलीची प्रक्रिया सुरु आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत तर काही प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत. यावर समितीने अशी सुचना केली की, जी प्रकरणे न्यायप्रविष्ठ आणि फौजदारी गुन्हे दाखल झालेली नाहीत त्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रामुख्याने ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या प्रकरणांमध्ये १ कोटी २८ लाख रुपये गुंतलेले आहेत. एकूण १६ प्रकरणे आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांवर अपहाराबद्दल गुन्हे दाखल झालेले आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

एकूण किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत अशी समितीने विचारणा केली असता एकूण १६ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून या सर्व प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल झालेले आहेत असे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले. यावर समितीने असे निदेश दिले की, अफरातफर व गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम वसुल करावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, आता ज्या केसेस आहेत त्याचा पाठपुरावा करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. एकूण २ कोटी ८८ लाख रुपयांपैकी २ कोटी ६ लाख रुपये वसुल करावयाचे राहिले आहेत. ही रक्कम खुप मोठी आहे. त्यांनी या प्रकरणांचा पाठपुरावा करुन वसुली करणे आवश्यक आहे. याबाबत तात्काळ वसुलीची कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत २८८ प्रकरणे अफरातफर व गैरव्यवहाराची प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये एकूण २,८४,२३,११७/- रुपये इतकी रक्कम गुंतलेली असून त्यापैकी केवळ ४५,९७,८३०/- रुपये वसुल करण्यात आले आहेत. अजून रुपये २,३८,२५,२८७/- एवढी रक्कम वसुल करणे बाकी आहे. सदर प्रकरणे सन १९९४-१९९५ पासून प्रलंबित आहेत. यामध्ये एकूण ४७७ व्यक्ती दोषी आहेत. एकूण १६ प्रकरणे न्यायप्रविष्ट असून या सर्व प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल झालेले आहेत. न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे व विभागीय चौकशीमुळे रकमा वसुल झालेल्या नाहीत.

सन १९९४-९५ पासून प्रकरणे प्रलंबित राहणे योग्य नाही. एकूण रकमेपैकी किमान निम्मी रक्कम तरी वसुल करणे आवश्यक होते. या गैरव्यवहार व अफरातफर प्रकरणी दोषी व्यक्तींविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती समितीला पाठविण्यात आलेली नाही. करोडो रुपयांचा अपहार करुन १०-१० वर्षे ही रक्कम वापरुन झाल्यानंतर हप्त्याहप्त्याने सोयीस्कररित्या फेडायची ही कृती अयोग्य व गंभीर आहे, याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

शिक्षण विभागामध्ये ५ प्रकरणे होती व त्यामध्ये ५ व्यक्ती दोषी आढळून आल्या होत्या. याप्रकरणी १०,९४,३०७/- एवढी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी ३,९४,५४४/- एवढी रक्कम संबंधित अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनातून वसुल केलेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ६,९९,७६३/- वसुल करण्यात यावी.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यकारी अभियंत्यांमार्फत रुपये १ कोटी ४८ लाख रुपये ग्रामीण पाणी पुरवठा समितीकडे गुंतलेले होते. जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई असताना खाते जोपर्यंत बंद होत नाही तोपर्यंत नवीन योजना सुरु करता येऊ शकत नाही. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायतीला लाभ होण्याच्या दृष्टीने व्यवस्था करावी. ग्रामीण पाणी पुरवठा समितीच्या मालमत्तेवर बोजा चढवून रक्कम वसुलीची कार्यवाही करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावी.

विभागीय स्तरावरील प्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी लक्ष घालून निपटारा करावा. दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन १९९६-१९९७ ते १९९९-२००० या कालावधित शासनाकडून एकूण रुपये ८,७६,००,०००/- इतकी रक्कम उस्मानाबाद जिल्हा परिषदेस प्राप्त झाली आहे. पंचायत समिती निहाय रकमा शासनाकडून सादर करण्यात याव्यात. ११ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक ३० मार्च, २००२ ते २३ फेब्रुवारी, २००५ या कालावधित उस्मानाबाद जिल्हा परिषदेला एकूण रुपये २३,१२,८१,०००/- इतकी रक्कम शासनाकडून प्राप्त झाली आहे. पंचायत समिती निहाय रकमा शासनाकडून पाठविण्यात याव्यात.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांतर्गत अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधातील दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत ५ प्रकरणांत गुंतलेली मु.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळा (बु), ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद उर्वरित रक्कम रुपये २,१२,९८१/- वसुल करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.

ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२-२०१३ या कालावधित अफरातफरीची एकूण २५२ प्रकरणे उघडकीस आली असून माहे डिसेंबर, २०१७ अखेर २३४ प्रकरणात रुपये ३२,४६,४४०/- एवढी रक्कम वसुल करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस पाठविण्यात यावी.

पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, तुळजापुर या कार्यालयांतर्गत अपहारित रक्कम रुपये २,४९,९४६/- एवढी होती. सदर प्रकरणात ३ अधिकारी व १ कर्मचारी गुंतलेले असून त्यांच्याकडून रुपये २,४९,९४६/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेले आहेत, याबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा (नि.) ता.परांडा येथील श्री.एस.डब्ल्यू. सौदागर, आरोग्य सेवक व डॉ.आर.टी.जाधवर, वैद्यकीय अधिकारी यांचेविरुध्द दिनांक ७ जून, २००२ अन्वये पोलीस गुन्हा नोंद करण्यात आला आहे. श्री. सौदागर यांचे वेतनातून दरमहा २५ टक्के प्रमाणे रुपये ४,५०,४४०/- रक्कम १००% वसुल करण्यात आलेली आहे, याबद्दल समिती समाधान व्यक्त करते. श्री.आर.टी.जाधवर, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, जवळा (नि.) ता.परांडा यांच्याकडील वसुलपात्र रक्कम मा.न्यायालयाच्या निर्णयास अधिन स्थावर/जंगम मालमत्तेवर आर.आर.सी. ची कार्यवाही करण्यात यावी व रक्कम वसुल करण्यात यावी.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात अफरातफर तसेच गैरव्यवहार संबंधातील रक्कम रुपये २५,४००/- वसुल झालेली आहे व संबंधीतांविरुध्द केलेल्या यथायोग्य कारवाई प्रकरणी समिती समाधान व्यक्त करते.

कृषी विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर पर्यंत २ प्रकरणे प्रलंबित होती. रुपये १०,८४,२५८/- पैकी रुपये २,५०,०६३/- अद्याप वसुली बाकी आहे. याप्रकरणी दोन व्यक्ती दोषी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. यापैकी श्री. खरपुडे यांनी पूर्ण रक्कमेचा भरणा केलेला असून श्री.एस.डी.गायकवाड यांनी अद्याप भरणा केलेला नाही. त्यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ केलेले असले तरी प्रलंबित रक्कम वसुल करण्यासाठी मा.न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून उर्वरित रक्कम रुपये ५,८०,५६५/- वसुल करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस पाठविण्यात यावी.

लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण ९ गैरव्यवहाराची प्रकरणे असून सदर प्रकरणांमध्ये एकूण ३७ अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश आहे. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अपहारित रक्कम निश्चित करण्यात यावी. सदरची प्रकरणे सन १९९४-९५ मधील असून गैरव्यवहार प्रकरणातील १२ अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. १८ अधिकारी ज्या ठिकाणी कार्यरत असतील त्याचा शोध घेण्यात येऊन त्यांचेविरुध्द नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी. ४ अभियंत्यांकडून निश्चित केलेल्या निलंबन निधीनुसार दरमहा वेतनातून वसुली करण्यात यावी व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

ग्रामीण पाणी पुरवठा, विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबादकडे जलस्वराज्य प्रकल्प मधील अपहार झालेल्या पाणी पुरवठा योजनेतील १६ प्रकरणे आहेत. वसुलीची एकूण रक्कम रुपये १,२८,०९,२५०/- इतकी आहे. सदर रकमेच्या वसुलीसाठी संबंधीतांच्या ७/१२ वर बोजा चढविण्यात यावा, यासाठी मा.न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पुढील कार्यवाही करावी. तसेच अफरातफर व गैरव्यवहाराच्या प्रकरणी १६ गावच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष/सचिव अशा ३४ व्यक्तींविरुध्द पोलीस गुन्हे दाखल केलेले असून दोषारोप पत्र मा. न्यायालयास सादर करण्यात आले आहे. मा.न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

## सर्व शिक्षा अभियानांतर्गत झालेला गैरव्यवहार

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधित उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या बाबत सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, सर्वशिक्षा अभियान कार्यक्रमासाठी जिल्ह्याची मागणी शासनाकडे सादर केली जाते. परंतु, काही वेळा शासनाकडून निधी दिला जात नाही. अहवाल वर्षी शासनाकडून निधी न मिळाल्यामुळे 'निरंक', असे दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे हा विषय विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी ठेवण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेला सर्व शिक्षा अभियानांतर्गत मार्च, २०१५ अखेर प्राप्त झालेल्या अनुदानातून जिल्हापरिषदेने विविध कामे करणे आवश्यक होते. त्यानुसार प्रश्नावली क्रमांक १ वर जिल्हा परिषद प्रशासनाकडून बहुतांश कामे निरंक असल्याची माहिती प्राप्त झाली. यासंदर्भात विभागाने चौकशी केली आहे काय व त्याबाबत अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय आहेत ?

(२) साक्षीचे वेळी जिल्हा परिषदेकडून मंत्रालयीन विभागास मागणी करण्यात आली होती, परंतु विभागाने निधी उपलब्ध करुन दिला नाही अशीही माहिती समितीस प्राप्त झाली आहे, त्यानुसार सर्व शिक्षा अभियांतर्गत झालेल्या सर्व कामांची माहिती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी केंद्र शासन पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत बांधकाम उपक्रमामध्ये नविन प्राथमिक शाळा इमारत, अतिरिक्त वर्गखोली तसेच स्वच्छता गृह इत्यादी विविध बांधकामे करण्यात येतात.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक भारत सरकारला मंजूरीस्तव सादर करण्यात येते. भारत सरकार यांचे स्तरावर मुल्यांकन करुन प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये राज्याच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. यामध्ये एकूण अर्थसंकल्पाच्या ३३ टक्के च्या कमाल मर्यादेत बांधकामे मंजूर करण्यात येतात.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत केवळ शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांना बांधकामे मंजूर करण्यात येतात. बांधकामामध्ये नवीन प्राथमिक शाळा इमारत बांधकामे, वर्ग खोली बांधकामे यांना प्राधान्य देण्यात येते. गट साधन केंद्र बांधकाम वगळून इतर सर्व बांधकामे संबंधित शाळा व्यवस्थापन समिती यांच्यामार्फत करण्यात येतात.

सर्व शिक्षा अभियातर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक मंजुरीनुसार ज्या कामासाठी निधी मंजूर केला आहे. त्याच कामासाठी निधी वापरण्यात येतो. त्यामुळे त्या त्या वर्षी वार्षिक कार्ययोजना व अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेली कामे मंजूर झालेली नाहीत ती कामे निरंक म्हणून उस्मानाबाद जिल्हा परिषद प्रशासन अहवालामध्ये दर्शविण्यात आलेली आहेत.

बांधकामे वार्षिक कार्ययोजना अर्थसंकल्पामध्ये मंजूर नसल्यामुळे निरंक दर्शविण्यात आली त्यामुळे विभागाकडून चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(२) दर वर्षी वार्षिक कार्य योजना व अर्थसंकल्प (Annual work plan & Budget) मध्ये जेवढी तरतूद होते, तेवढा निधी प्रत्यक्षात प्राप्त होत नाही. त्यामुळे वार्षिक कार्ययोजना व अर्थसंकल्पामध्ये जरी तरतूद मंजूर असली तरी प्रत्यक्षात प्राप्त होणारा निधी व जिल्ह्याची मागणी विचारात घेऊन जिल्ह्यांना निधी वितरित करण्यात येतो.

उपलब्ध निधीनुसार सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत झालेल्या सर्व कामांची माहिती परिशिष्ट-अ मध्ये देण्यात येत आहे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत बांधकामे - जिल्हा उस्मानाबाद (परिशिष्ट - अ)

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | सन २००२-०३ | | | | सन २००३-०४ | | | | सन २००४-०५ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १. | गट साधन केंद्र | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | समुह साधन केंद्र | ० | ० | ० | ० | १८ | १८ | ० | ० | २८ | २८ | ० | ० |
| ३. | नवीन प्राथमिक शाळा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | अतिरिक्त वर्गखोली | ११४ | ११४ | ० | ० | १४१ | १४१ | ० | ० | ११२ | १०९ | ३ | ० |
| ५. | स्वच्छतागृह (मुलांकरीता) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | स्वच्छतागृह (मुलींकरीता) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १४० | १४० | ० | ० |
| ८. | संरक्षक भिंत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९. | विद्युतीकरण | ० | ० | ० | ० | १३५ | १३५ | ० | ० | ११५ | ११५ | ० | ० |
| १०. | गटसाधान केंद्र सक्षमीकरण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | मोठी दुरुस्ती (प्राथ. व उच्च प्राथ.) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | उताराचा रस्ता | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण .. | ११४ | ११४ | ० | ० | २९६ | २९६ | ० | ० | ३९५ | ३९२ | ३ | ० |

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | सन २००५-०६ | | | | सन २००६-०७ | | | | सन २००७-०८ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १. | गट साधन केंद्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | समुह साधन केंद्र | २० | २० | ० | ० | १६ | १६ | ० | ० | ० | ० | ० | ० |

**परिशिष्ट - अ**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | नवीन प्राथमिक शाळा | ७ | ६ | ० | १ | १ | १ | ० | ० | ६० | ६० | ० | ० |
| ४. | अतिरिक्त वर्गखोली | ११० | ११० | ० | ० | ३०० | २९८ | २ | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | स्वच्छतागृह (मुलांकरीता) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | स्वच्छतागृह (मुलींकरीता) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | संरक्षक भिंत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३४ | ३४ | ० | ० |
| ९. | विद्युतीकरण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २८६ | २८६ | ० | ३० |
| १०. | गट साधान केंद्र सक्षमीकरण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | मोठी दुरुस्ती (प्राथ. व उच्च प्राथ.) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २१ | २१ | ० | ० |
| १२. | उताराचा रस्ता | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण .. | १३७ | १३६ | ० | १ | ३१७ | ३१५ | २ | ० | ४०१ | ३७१ | ० | ३० |

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | सन २००८-०९ | | | | सन २००९-१० | | | | सन २०१०-११ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १. | गट साधन केंद्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | समुह साधन केंद्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | नवीन प्राथमिक शाळा | ८ | ८ | ० | ० | १५ | १५ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | अतिरिक्त वर्गखोली | ७६ | ७४ | १ | १ | १६५ | १६३ | २ | ० | १२७ | १२४ | २ | १ |
| ५. | स्व्छतागृहा (मुलांकरीता) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २३ | २३ | ० | ० |
| ६. | स्वच्छतागृह (मुलींकरीता) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १३४ | १३४ | ० | ० |

**परिशिष्ट - अ**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६ | ६ | ० | ० |
| ८. | संरक्षक भिंत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १४० | १४० | ० | ० |
| ९. | विद्युतीकरण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १०. | गट साधान केंद्र सक्षमीकरण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | मोठी दुरुस्ती (प्राथ. व उच्च प्राथ.) | ११ | ११ | ० | ० | ११ | ११ | ० | ० | १४० | १४० | ० | ० |
| १२. | उताराचा रस्ता | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण . . | ९५ | ९३ | १ | १ | १९१ | १८९ | २ | ० | ५७० | ५६७ | २ | १ |

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | सन २०११-१२ | | | | सन २०१२-१३ | | | | सन २०१३-१४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १. | गट साधन केंद्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | समुह साधन केंद्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | नवीन प्राथमिक शाळा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | अतिरिक्त वर्गखोली | ३३० | ३२५ | ५ | ० | ५९ | ५८ | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ५. | स्व्छतागृह (मुलांकरीता) | ० | ० | ० | ० | ३४ | ३४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | स्वच्छतागृह (मुलींकरीता) | ५ | ५ | ० | ० | १५३ | १५३ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | ४ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | संरक्षक भिंत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९. | विद्युतीकरण | ० | ० | ० | ० | २२९ | २२९ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १०. | गटसाधान केंद्र सक्षमीकरण | ५ | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | मोठी दुरुस्ती (प्राथ. व उच्च प्राथ.) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | उताराचा रस्ता | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ३४४ | ३३९ | ५ | ० | ४७५ | ४७४ | ० | १ | ० | ० | ० | ० |

**परिशिष्ठ - अ**–चालू

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | सन २०१४-१५ | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली | भौतिक लक्ष | पूर्ण झालेली | प्रगती पथावरील | सुरु न झालेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | गट साधन केंद्र | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | ० |
| २. | समुह साधन केंद्र | ० | ० | ० | ० | ८२ | ८२ | ० | ० |
| ३. | नवीन प्राथमिक शाळा | ० | ० | ० | ० | ९१ | ९० | ० | १ |
| ४. | अतिरिक्त वर्गखोली | ७५ | ३० | ३० | १५ | १६०९ | १५४६ | ४५ | १८ |
| ५. | स्व्छतागृहा (मुलांकरीता) | ३ | ३ | ० | ० | ६० | ६० | ० | ० |
| ६. | स्वच्छतागृह (मुलींकरीता) | ३ | ३ | ० | ० | २९५ | २९५ | ० | ० |
| ७. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | ० | ० | ० | ० | १५० | १५० | ० | ० |
| ८. | संरक्षक भिंत | ० | ० | ० | ० | १७४ | १७४ | ० | ० |
| ९. | विद्युतीकरण | ० | ० | ० | ० | ७६५ | ७३५ | ० | ३० |
| १०. | गटसाधान केंद्र सक्षमीकरण | ० | ० | ० | ० | ५ | ५ | ० | ० |
| ११. | मोठी दुरुस्ती (प्राथ. व उच्च प्राथ.) | ० | ० | ० | ० | १८३ | १८३ | ० | ० |
| १२. | उताराचा रस्ता | ३५ | १५ | २० | ० | ३५ | १५ | २० | ० |
| | एकूण | ११६ | ५१ | ५० | १५ | ३४५१ | ३३३७ | ६५ | ४९ |

**जिल्हा परिषद, उस्मानाबाद**

**सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सर्व उपक्रमासाठी निधीचा तपशील**

**परिशिष्ट - ब**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | वर्षे | अर्थसंकल्पीय मंजूर तरतूद | वितरीत निधी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | २००३-०४ | १३५८.१० | ७०२.६१ |
| २. | २००४-०५ | १५३३.५४ | ८५७.६८ |
| ३. | २००५-०६ | १४०२.१४ | १०४८.५९ |
| ४. | २००६-०७ | १६४०.०३ | १५२७.२५ |
| ५. | २००७-०८ | १३५३.६८ | १३७२.१० |
| ६. | २००८-०९ | १७७१.५८ | १७७१.५८ |
| ७. | २००९-१० | २१४७.४७ | १९५९.२५ |
| ८. | २०१०-११ | ३६४४.३३ | २७५२.१५ |
| ९. | २०११-१२ | ४७४६.१४ | ३५७२.३७ |
| १०. | २०१२-१३ | ३८४१.०५ | २९१७.०४ |
| ११. | २०१३-१४ | १९८४.७२ | १७७५.९८ |
| १२. | २०१४-१५ | २१६५.३९ | १८३७.६४ |
| | एकूण . . | २७५८९.१५ | २२०९४.२४ |

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** (१) व (२) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा पातळीवरुन जेवढी मागणी केली जाते तेवढी सर्व मंजूर होत नाही. कारण बांधकामाबाबत भारत सरकार पातळीवर एक समजूत निर्माण झाली आणि ती खरी आहे. सर्व शिक्षा अभियान एवढे वर्ष राबविल्यानंतर शाळा, खोली हे सर्व जे काम आहे ते पुन्हा-पुन्हा निघत नसतात म्हणून आधी एक तृतीयांश पर्यंतची जी मर्यादा होती ती कमी होत आलेली आहे आणि कालांतराने ती पुनरिक्षित होणार आहे. मागणी केल्यानुसार तेवढे काम किंवा खोल्या मंजूर होत नाहीत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, पटसंख्येनुसार भौतिक आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे हा सर्व शिक्षा अभियानाचा अर्थ आहे. हा केंद्र शासनाचा प्रकल्प होता, परंतु आपण डायस मधून माहिती मागवतो त्याप्रमाणे मागणी करतो. मग त्याप्रमाणे मागणी पूर्ण का होत नाही. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी असा खुलासा केला केला की, अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध नसेल तर ती मागणी पूर्ण होत नाही. केंद्र सरकार याची तरतुद करते असे सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस सांगितले. यावर समितीने अशी विचारणा केली की, केंद्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून आपल्यापैकी कोण काम करते. मीच स्वतः हे काम करतो आणि आम्ही सर्वजण मिळून मागणी पाठवितो, पण सर्व देशात जी उपलब्धता आहे त्याप्रमाणे अलिकडच्या काळात बांधकामासाठी पैसे देत नाहीत अशी माहिती समितीस विशद करण्यात आली.

यानंतर समितीने पुढे अशी सुचना केली की, पूर्ण महाराष्ट्र राज्याची जिल्हानिहाय माहिती घेऊन बांधकामावर केलेली मागणी केंद्र सरकारने प्राधान्याने मंजूर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. तद्नंतर समितीने पुढे असे विदित केले की, खाजगी शाळा आणि जिल्हा परिषद शाळा यांच्यामध्ये स्पर्धा वाढल्यामुळे जिल्हा परिषदांच्या शाळेवर वितरित परिणाम झाला आणि पटसंख्या घटली याची आपण माहिती दिली. समिती जेव्हा दौरे करते तेव्हा समितीच्या असे लक्षात येते की, आपण शिक्षकांना डेली नोटस्च्या आधारे टाचण लिहायला सांगतो आणि त्याच्या आधारे त्यांचे पगार बिल मंजूर करतो. पण त्यानुसार त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारला काय, डेली नोटस् प्रमाणे त्यांनी विद्यार्थ्यांना शिकविले काय, याची तपासणी करण्याची जबाबदारी ज्या केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, उप शिक्षण अधिकारी किंवा शिक्षण अधिकारी यांच्यावर आहे तर त्यांनी ती कधीही केली नाही. तसेच ज्ञान रचना वादामध्ये विद्यार्थ्याला अपडेट करण्यासाठी फार मोठा कार्यक्रम आला आहे. ज्ञान रचनावाद हा उपक्रम तातडीने राबविला पाहिजे. कारण विद्यार्थ्यांना अद्ययावत करण्यासाठी हा कार्यक्रम उपयुक्त आहे. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक २२ जून, २०१५ रोजी जो प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम हाती घेतला आहे. त्या कार्यक्रमामध्ये या स्पष्ट सूचना आहेत की, दैनिक टाचण न पाहता मुलांना पाहण्यात यावे. हे सर्वात महत्वाचे आहे. आता या उपक्रमाला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याच शासन निर्णयामध्ये ज्ञानरचना वाद या उपक्रमाचा समावेश आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागाने बसविलेल्या यंत्रणेचे म्हणजे केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांचे सदरहू अभियानात दुर्लक्ष आहे. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी सन्माननीय सदस्यांना जे अपेक्षित आहे त्या पातळीपर्यंत आमची यंत्रणा आली आहे आणि महिन्यातून एकदा प्रत्येक मुलाचे अध्ययन स्तर निश्चित करण्यात येत आहे. मुख्य सचिव, महोदयांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मुलाच्या वर्षातून ३ चाचण्या घेण्यात येतात आणि प्रत्येक मुलाची माहिती विभागाच्या/जिल्हा परिषदेच्या संगणकामध्ये उपलब्ध आहे. विभागाला हे सर्व करण्यासाठी ३ वर्षाचा कालावधी लागला. समितीच्या निदेशानुसार पुढील काळात त्यामध्ये झपाट्याने वाढ होण्याबाबत योग्यप्रकारे नियोजन केले जाईल असे समितीस विदित केले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या जिल्हा परिषद उस्मानाबादच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील लेखी माहितीच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सर्वशिक्षा अभियान कार्यक्रमासाठी जिल्ह्याची मागणी शासनाकडे सादर केली जाते. परंतु, काही वेळा शासनाकडून निधी दिला जात नाही. अहवाल वर्षी शासनाकडून निधी न मिळाल्यामुळे 'निरंक', असे दर्शविण्यात आले आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी केंद्र शासन पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत बांधकाम उपक्रमामध्ये नविन प्राथमिक शाळा इमारत, अतिरिक्त वर्ग-खोली तसेच स्वच्छता गृह इत्यादी विविध बांधकामे करण्यात येतात.सर्व शिक्षा अभियानांतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक भारत सरकारला मंजुरीस्तव सादर करण्यात येते. भारत सरकार यांचे स्तरावर

मूल्यांकन करुन प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये राज्याच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. यामध्ये एकूण अर्थसंकल्पाच्या ३३ टक्केच्या कमाल मर्यादेत बांधकामे मंजूर करण्यात येतात. सर्व शिक्षा अभियानांतर्गत वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक मंजुरीनुसार ज्या कामासाठी निधी मंजूर केला आहे त्याच कामासाठी निधी वापरण्यात येतो. त्यामुळे त्या त्या वर्षी वार्षिक कार्य योजना व अर्थसंकल्प प्रस्तावित केलेली कामे मंजूर झालेली नाहीत ती कामे निरंक म्हणून दर्शविण्यात आलेली आहेत.

दरवर्षी वार्षिक कार्य योजना व अर्थसंकल्पामध्ये जेवढी तरतुद होते तेवढा निधी प्रत्यक्षात प्राप्त होत नाही. प्रत्यक्षात प्राप्त होणारा निधी व जिल्ह्याची मागणी विचारात घेऊन जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात येतो. परंतु सध्या समितीस प्राप्त झालेल्या माहितीनुसार परिशिष्ट अ मध्ये सन २००४ ते २००५ या कालावधीत १०९ कार्यखोल्या पूर्ण असून ३ वर्ग-खोल्यांचे बांधकाम प्रगती पथावर आहे. सन २००५ ते २००६ या कालावधीत ७ नवीन प्राथमिक शाळांचे भौतिक लक्ष होते, त्यापैकी एक सुरु न झालेली नविन प्राथमिक शाळा आहे. त्याच प्रमाणे सन २००६ ते २००७ मध्ये ३०० अतिरिक्त वर्ग खोल्यांपैकी २ खोल्यांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सन २००८ ते २००९ या कालावधीत एक अतिरिक्त वर्ग-खोली प्रगती पथावर आहे व १ वर्ग खोली सुरु न झालेली आहे. सन २००९ ते २०१० या कालावधीत दोन अतिरिक्त वर्ग-खोल्या प्रगतीपथावर आहेत. सन २०१० ते २०११ या कालावधीत २ अतिरिक्त वर्ग-खोल्या प्रगती पथावर आणि १ वर्ग खोली सुरु न झालेली आहे. सन २०११ ते २०१२ मध्ये ५ अतिरिक्त वर्ग खोल्या प्रगती पथावर आहे. सन २०१२ ते २०१३ मध्ये १ अतिरिक्त वर्ग-खोली सुरु न झालेली आहे. परिशिष्ट ब मध्ये सन २००३ ते २०१५ अर्थसंकल्पीय कालावधीत एकूण मंजूर तरतूद रक्कम रुपये २७५८९.१५ लक्ष आणि वितरित निधी रुपये २२०९४.२४ लक्ष आणि उर्वरित निधी रुपये ५४९४.९१ लक्ष निधी शिल्लक आहे.

खाजगी शाळा आणि जिल्हा परिषद शाळा यांच्यामध्ये स्पर्धा वाढल्यामुळे जिल्हा परिषदांच्या शाळेवर विपरित परिणाम झाला आणि पटसंख्या घटली आहे. समिती जेव्हा दौरे करते तेव्हा समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, आपण शिक्षकांना दैनंदिन टिपणाच्या आधारे टाचण लिहायला सांगितले जाते आणि त्याच्या आधारे त्यांचे पगार देयक मंजूर करण्यात येते, परंतु त्यानुसार विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याबाबत शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शिकविले जाते काय याची तपासणी करण्याची जबाबदारी ज्या केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, उप शिक्षण अधिकारी किंवा शिक्षण अधिकारी यांच्यावर आहे त्यांनी ती कधीही पार पाडलेली नाही. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक सुविधा व शैक्षणिक दर्जाकडे दुर्लक्ष झालेले आहे. महिन्यातून एकदा प्रत्येक मुलाचा अध्ययन स्तर निश्चित करण्यात यावा व जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या पटसंख्येमध्ये घट होणार नाही, शालेय विद्यार्थी अद्ययावत राहावेत यादृष्टीने सतत प्रयत्नशील रहावे.

**पटसंख्येनुसार भौतिक आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे असे उपक्रम सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबवले जातात. शासनाचे प्रतिनिधी म्हणून शालेय शिक्षण विभागाचे सचिव हे काम करतात व सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवीन प्राथमिक शाळा, अतिरिक्त वर्ग खोल्या, स्वच्छतागृहे पेयजल सुविधा इत्यादी भौतिक आणि शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेसाठी त्याप्रमाणे बांधकामासाठी संपूर्ण राज्यातील जिल्हानिहाय जेवढी मागणी आहे ती भारत सरकारकडे प्राधान्याने पाठवून मंजूर करुन घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### गाळेधारकाच्या थकित भाडे वसुलीबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने बांधलेल्या शॉपिंग सेंटर्सबाबत समितीकडे अनेक तक्रारी आलेल्या आहेत. मुळात ज्या लोकांना जिल्हा परिषदेने भाडेतत्वावर गाळे दिलेले आहेत, त्या व्यक्तींकडून व्यवसायासाठी त्या गाळ्यांचा उपयोग न होता त्यांनी ते गाळे आणखी अन्य व्यक्तींना भाडे तत्वावर दिलेले आहेत, म्हणजेच त्यांनी पोटभाडेकरू ठेवले आहेत. वास्तविक पाहता नियमाप्रमाणे अशा प्रकारे पोटभाडेकरू ठेवता येत नसल्याने अशा लोकांचे भाडेकरार रद्द करण्याची कारवाई जिल्हा परिषदेने करावयास हवी होती, परंतु, अनेक वर्षापासून जिल्हा परिषद अधिका-यांच्या संरक्षणामुळे ही अनियमितता घडत आहे. या संदर्भात आपला खुलासा काय आहे अशी समितीने विचारणा केली असता याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उस्मानाबाद शहरातील गाळ्यांचे वाटप २३ वर्षापूर्वी करुन संबंधितांशी करारनामे करण्यात आले होते. या संदर्भातील कागदपत्रे जिल्हा परिषदेस उपलब्ध झालेली नाहीत. तथापि, समितीच्या भावना लक्षात घेऊन या संदर्भातील सर्वंकष चौकशी करुनत्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईलअसे समितीस आखाासित केले.

तसेच जिल्हा परिषदेच्या मालमत्तांसंबंधी सर्व्हे करण्यात येईल, असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केला आहे. सर्व्हे झाल्यानंतर व सर्व मालमत्तांची नोंद जिल्हा परिषदेच्या नावे झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल देखील त्यांनी समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) जिल्हा परिषदेच्या मालकीचे २३ गाळे असून त्यातील काही भाडेकरुकडून ४,३१,३६,१९२/- एवढी रक्कम थकित असून सदर भाड्याची वसुली करण्याकरिता जबाबदार विभाग प्रमुख कोण होते व त्यांचेवर जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे. अद्याप अशी कोणतीही कारवाई केली नसल्यास होत असलेल्या विलंबास कोण जबाबदार आहे ?

(२) प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ असून प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) मा.पंचायत राज समितीचे दिलेल्या निर्देशानुसार जि.प.च्या मालकीचे २३ गाळे भाडे रुपये ४,३१,३६,१९२/- थकीत राहण्यास जबाबदार असलेले तत्कालीन (२४) कार्यकारी अभियंता (बां) यांची यादी सोबत संलग्न केली आहे.

संबंधित कार्यकारी अभियंता (बां) यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही अनुसरणेचे अनुषंगाने त्यांचे कार्यालयाचे पत्ते उपलब्ध करुन घेण्यासाठी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना दि.०३/११/२०१६ व दि.१३/१२/१६ अन्वये पत्र दिलेले आहे.

उक्त माहिती उपलब्ध न झाल्याने दिनांक ११/१०/२०१७ रोजी मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अवगत केलेले असुन त्याअनुषंगाने मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी दिनांक ११/१०/२०१७ रोजी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना पत्र देऊन जि.प.ने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.तथापि सदर माहिती अद्याप अप्राप्त असून प्रकरणातील संबंधित कार्यकारी अभियंता हे सार्वजनकि बांधकाम विभागाशी संलग्न असल्यामुळे पुन्हा दिनांक ०६/०१/२०१८ रोजी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना पत्र देवून माहितीची मागणी केलेली असून माहिती अभावी संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता (बां) यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे प्रलंबित आहे.

(२) सदरील बाबतीत एकूण २३ प्रकरणे मा.जिल्हा न्यायालयात दाखल असून अद्याप सर्व प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहेत. तथापि याप्रकरणी गाळे निष्काषित करण्याची तसेच थकीत भाडे गाळेधारकांकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय : (पंरा-५)**

जिल्हा परिषद उस्मानाबादकडून कार्यवाही करण्यात येत असून, भाड्याची वसूली करण्याकरीता जबाबदार असलेल्या कार्यकारी अभियंत्यांविरुध्द करावयाच्या विभागीय चौकशीचे प्रस्ताव दोषारोपांसह प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने तातडीने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्याबाबत तसेच गाळे निष्काषित करण्याची तसेच थकीत भाडे गाळेधारकांकडून वसुल करण्याची कार्यवाही करताना न्यायप्रविष्ठ प्रकरणी मा.न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना कळविण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ४ कोटी ३१ लाख रुपयांची गाळे भाड्यांची वसुली झाली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, यामध्ये न्यायालयाची स्थगिती आहे. २३ पैकी ५ प्रकरणात जिल्हा न्यायालयाचा निर्णय झाला, मात्र तो जिल्हा परिषदेच्या विरोधात गेल्यामुळे या ५ प्रकरणात जिल्हा परिषदेने उच्च न्यायालयामध्ये अपिल केले आहे. १८ प्रकरणे जिल्हा न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत. याबाबत कारवाई सुरु केली त्यावेळी न्यायालयाची स्थगिती आलेली आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावर प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांच्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेच्या मालकीचे २३ गाळे असून त्यातील काही भाडेकरु यांचेकडून रुपये ४,३१,३६,१९२/- एवढी भाडे वसूलीची रक्कम थकित आहे. मुळात ज्या व्यक्तींना जिल्हा परिषदेने भाडे तत्वावर गाळे दिलेले होते, त्याच व्यक्तींनी नियमांचे उल्लंघन करुन पोटभाडेकरु ठेवलेले आहेत. सदरहू भाडेकरार रद्द करण्याची कारवाई जिल्हा परिषदेने करणे आवश्यक होती, परंतु जिल्हा परिषदेच्या अधिका-यांच्या संरक्षणामुळे ही अनियमिता घडलेली आहे.

सदरहू गाळयांचे वाटप २३ वर्षापूर्वी झाले होते व सबंधितांशी करारनामे करण्यात आले होते या संदर्भातील कागदपत्रे जिल्हापरिषदेकडे उपलब्ध नाहीत याचे समितीस आश्चर्य वाटते. तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई बाबत दिनांक ११.१०.२०१७ तसेच दि.६/०१/२०१८ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना कळविण्यात येऊन देखील तत्कालीन कार्यकारी अभियंता (बां) यांचे विरुध्द कोणतीही प्रशासकीय कार्यवाही करण्याचे दिसून येत नाही, याबद्दल समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. सदर २३ प्रकरणामध्ये मा. जिल्हा न्यायालयात दावा दाखल करण्यात आला असून १८ प्रकरणे मा. जिल्हा न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत.

**प्रस्तुत प्रकरणी मा. न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पुढील प्रक्रिया करण्यात यावी व रुपये ४, ३१,३६,१९२/- एवढी गुंतलेली रक्कम वसूल करण्यात दिरंगाई करणा-या संबंधित कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व उपरोक्त रक्कम वसूल करावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभांना उपस्थित न राहण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने अशी विचारणा केली की, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देणे अनिवार्य असल्याचे समजले जाते. परंतु समितीने जिल्ह्यातील वाशी, परांडा व भूम पंचायत समित्यांना भेटी दिल्या असता कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी पंचायत समित्यांना एकदाही भेट दिली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा हे पद अनेक काळापासून रिक्त होते. सद्य:स्थितीत संबंधित अधिका-यांकडे त्यासंदर्भातील अतिरिक्त कार्यभार दिलेला होता. या पदावर काम करण्यासाठी संबंधित अधिकारी हे बाहेरच्या जिल्ह्यातून आलेले होते. संबंधित अधिका-यांनी त्यावेळी आवश्यक त्या भेटी न दिल्यामुळे त्यांना कारणे दाखवा दिलेली होती. सद्य:स्थितीत संबंधित अधिकारी रजेवर असल्याने त्यांनी पंचायत समितीला भेटी दिलेल्या नाहीत, ते मी या ठिकाणी मान्य करतो.

तद्नंतर समितीने पुढे विदित केले की, समितीने उस्मानाबाद पंचायत समितीला भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, उस्मानाबाद पंचायत समितीला मुख्य लेखा व वित्त अधिका-याने देखील भेट दिलेली नाही. तथापि, वर्षातून एकदा तरी पंचायत समितीमधील बैठकांसाठी वरिष्ठ अधिका-यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच पंचायत समिती परांडाला मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी भेट दिल्याचे गट विकास अधिकारी यांनी उत्तर दिले होते. पण त्याच वेळी सहाय्यक लेखा अधिकारी यांनी पंचायत समिती, परांडा येथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी उपस्थित न राहता त्यांनी संचिका मागवून स्वाक्षरी केली असल्याची माहिती दिलेली होती.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, जे अधिकारी पंचायत समितीला भेट देत नाही किंवा पंचायत समितीमधील बैठकांना उपस्थित राहत नाहीत, अशा अधिका-यांची चौकशी करून त्यांची एक वेतनवाढ थांबविण्याबाबत सूचना केलेली होती. यानुसार योग्य ती कार्यवाही करुन त्यासंदर्भातील अहवाल पंचायती राज समितीला सादर केला जाणार आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी परिपत्रक काढून विभाग प्रमुखांना पंचायत समित्यांच्या मासिक सभांना उपस्थित रहाण्याचे आदेशित करुनही तसेच याबाबत विविध शासन निर्णय असतांना जे विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहिले नाहीत, त्यांच्याविरुध्द चौकशी करुन खुलासे समाधानकारक नसल्यास त्यांची एक वेतनवाढ रोखण्याबाबत समितीने निदेश दिलेले आहेत.

त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने खुलासे मागविलेले असून पुढे कोणती कारवाई करण्यात आलेली आहे. अद्याप कारवाई करण्यात आलेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व त्यास कोण जबाबदार आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन परिपत्रक क्रमांक मविसे-१०/२००२/प्र.क्र.४००४/आस्था-३ दि.१०/०३/२००८ **(परिशिष्ट ११.१)** अन्वये जिल्हा परिषदेतील अधिकारी /कर्मचारी यांच्या भेटी व दौ-याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यानुसार खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांनी पंचायत समित्यांना दिलेल्या भेटीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

खालीलप्रमाणे पंचायत समित्यांना भेटी देवून मार्गदर्शन केलेले आहे.

| अ.क्र. | विभाग प्रमुखाचे नाव | पदनाम | भेटीची संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री.बी.एन.उबाळे | अति मुकाअ | १७ |
| २. | श्रीम.आर.एस.सातपुते | प्र.सं.जिग्रावियं | ८६ |
| ३. | श्री.एस.डी.बनसोडे | उप मुकाअ (सा) | ४१ |
| ४. | श्री.आर.एच.चव्हाण | उपजिस मग्रारोहयो | ९२ |
| ५. | श्री.शेखर अ.शेटे | मुले व वि अ | १४ |
| ६. | श्री.एस.एन.मुकणे | जिपशुसंअ | ०८ |
| ७. | श्री.आर.बी.तुबाकले | उप मुकाअ (पा व स्व) | ०८ |
| ८. | श्री.टी.के.नवले | उप मुकाअ (मवबाक) | ०६ |
| ९. | श्री.के.बी.खोत | कृविअ | २० |

तथापि सदरील प्रश्नामध्ये नमुद करण्यात आलेले परिपत्रक जिल्हा परिषद स्तरावरुन प्रत्यक्षात दि.०६/१०/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेले असून त्यानुसार जि.प.विभाग प्रमुखांनी दरमहा पंचायत समितींच्या सभांना उपस्थित राहणेचे अनुषंगाने रोष्टर तयार करुन देण्यात आलेले होते. मात्र दरम्यानचे कालावधी मध्ये मा.पंचायती राज समितीची जिल्हा परिषद, उस्मानाबादला भेट निश्चित झाल्यामुळे त्या अनुषंगाने पूर्व तयारी तसेच मुख्यालय स्तरावरील विविध बैठका आणि कार्यबाहुल्यामुळे विभाग प्रमुखाना पंचायत समितीच्या बैठकांना परिपत्रकातील रोष्टर नुसार उपस्थित राहणे शक्य झाले नाही. तथापी शासनाचे परिपत्रक क्रमांक मविसे-१०/२००२/प्र.क्र.४००४/आस्था-३ दि.१०/०३/२००८ व शासनाचे परिपत्रक क्रमांक पंरास-२०१०/प्र.क्र.३२/ पंरा-५ दिनांक २६/०७/२०१० मधील मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हा परिषदेच्या खाते प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी दिलेल्या आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय : (आस्था-२)**

जि.प.उस्मानाबाद कडून कारवाई संदर्भात प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभाग प्रमुखांनी मासिक सभेला उपस्थित न राहणे, याबाबत खुलासा करावा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी परिपत्रक काढून विभाग प्रमुखांना पंचायत समित्यांच्या मासिक सभांना उपस्थित राहण्याचे आदेशित केलेले असूनही तसेच याबाबत विविध शासन निर्णय असूनही जे विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहिले नाहीत, त्यांच्यावर चौकशी करुन खुलासे समाधानकारक नसल्यास त्यांची एक वेतनवाढ रोखण्याबाबत समितीने निर्देश दिले होते. पंचायत समितीचा कारभार गतिमान करावयचा असेल तर वरिष्ठ अधिका-यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच समितीने ज्या सुचना दिल्या आहेत त्या कनिष्ठ स्तरापर्यंत पोहचल्या पाहिजेत. उस्मानाबाद जिल्हा सर्व क्षेत्रावर गतिमान करण्याकरिता प्रयत्न केले पाहिजेत. पुढच्या कालखंडात अनियमितता होता कामा नये. नियमांचे कटाक्षाचे पालन झाले पाहिजे असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ व २ च्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर संबंधीत अधिका-यांच्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देणे अनिवार्य असल्याचे समजले जाते, परंतू समितीने वाशी, परांडा व भूम पंचायत समित्यांना भेटी दिल्या असता कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी पंचायत समित्यांना एकदाही भेट दिली नसल्याचे दिसून आले आहे, ही बाब अतिशय गंभीर व निराशाजनक आहे, त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती दर्शविते.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) हे पद दीर्घ कालावधीपासून रिक्त होते. सद्यःस्थितीत संबंधित अधिका-यांकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला होता त्यांनी आवश्यक त्या भेटी न दिल्यामुळे कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी देखील उस्मानाबाद पंचायत समितीला भेट दिलेली नाही. वर्षातून एकदा तरी पंचायत समितीमधील बैठकांसाठी वरिष्ठ अधिका-यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. पंचायत समिती, परांडा येथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी उपस्थित न राहता त्यांनी संचिका मागवून स्वाक्षरी केली असल्याचे दिसून आले आहे. यावरुन स्पष्ट होते की, संबंधित अधिका-यांनी जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे पंचायत समित्यांना भेटी दिलेल्या नाहीत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वेळोवेळी पंचायत समितीला भेट देऊन तपासणी करुन पंचायत समितीच्या वार्षिक अंदाजपत्रक व कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्याबाबत मार्गदर्शन करणे अपेक्षित असते. दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी यासंदर्भात परिपत्रक निर्गमित केलेले आहे, असे असूनही जिल्हा परिषदांमध्ये विभाग प्रमुख शासनाच्या परिपत्रकांकडे दुर्लक्ष करित असल्याचे दिसून येत आहे.

वस्तुतः पंचायत समित्यांना त्यांच्या कामामध्ये मार्गदर्शन करण्याकरिता पर्यवेक्षकीय जबाबदारी पार पाडणा-या उक्त विभाग प्रमुखांनी हजर राहिल्यास तालुक्यातील विकास कामांना गती येऊन ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न सुटण्यास मदतच होते. त्यामुळे सदर अधिका-यांनी पंचायत समित्यांना वारंवार भेटी देऊन व तिच्या मासिक सभांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणे आवश्यक असते. परंतू वरील सुचनांचे पालन होत नसल्यामुळे शासनाच्या विविध योजनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी होत नसून पदाधिकारी व अधिकारी यांच्यामध्ये समन्वय राहत नाही. पंचायत समित्यांचा अर्थसंकल्प वेळेत मांडणे व तो नियमानुसार खर्च करणे, ग्रामीण पाणी पुरवठा योजना तसेच महिला व मागासवर्गीयांसाठीचा निधी खर्च करणे, वैयक्तिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ देणे, पंचायत समिती अंतर्गत शाळांच्या तपासणी, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या तपासणी, अंगणवाड्याचे तपासणी इत्यादी सर्व सामान्य जनतेला दिला जाणा-या सोयी-सुविधांच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले जाते. विभाग प्रमुख पंचायत समितीच्या सभांना उपस्थित राहत नसल्यामुळे तसेच भेटी देत नसल्यामुळे त्याचा कामाकाजावर विपरित परिणाम होऊन सार्वजनिक हित जोपासले जात नाही. यासंदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन न करणा-या कसुरदार अधिका-यांची चौकशी करुन त्यांची एक वेतनवाढ थांबविण्यात यावी व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन त्यासंदर्भातील अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा. **तसेच विभागाने विभाग प्रमुखांनी द्यावयाच्या भेटी व उपस्थित राहावयाच्या मासिक सभा यासंदर्भात स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करावा व त्यात पंचायत समितीच्या मासिक सभांना अनुपस्थित राहणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याबाबत नमुद करुन संबंधित अधिका-यांची उपस्थिती अनिवार्य करावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद (प्रशासन)

### ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी जिल्ह्यातील पंचायत समित्यांना भेटी दिल्या. भेटीच्या वेळी या कार्यक्षेत्रामध्ये पंचायत समिती वाशी येथे झालेल्या बैठकीत समितीने ग्रामसेवकांची किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली असता, गट विकास अधिकारी, वाशी यांनी, सन २०१२-१३ मध्ये ग्रामसेवकांची पाच पदे रिक्त होती. तसेच पाच लोकांमध्ये अतिरिक्त ताबा देण्यात आलेला होता. सद्यःस्थितीत ७ ग्रामसेवकाची पदे रिक्त आहेत आणि ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी अकार्यकारी पदावर असल्यामुळे त्यांना ताबा देता येत नाही. ९ ग्रामपंचायतीचा अतिरिक्त चार्ज देण्यात आलेला आहे अशी समितीस माहिती विशद केली.

ग्रामसेवक मुख्यालयी राहतात काय असा प्रश्न समितीने विचारला असता, याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाशी यांनी ग्रामसेवक मुख्यालयी राहतात. ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाकडून प्रमाणपत्र घेतले जाते. तसेच सरपंचाचे प्रमाणपत्र अधिकृत धरले जाते काय, याबाबत तलाठी आणि ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाही, ही वस्तुस्थिती आहे. एखादी ग्रामपंचायत बंद असेल तर संबंधित ग्रामसेवकांना नोटीसा बजावलेल्या आहेत. तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तिकेत देखील नोंद घेतलेली आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, एका ग्रामसेवकाकडे जास्तीत जास्त किती ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे, अतिरिक्त कार्यभार देण्याची तरतूद नियमात आहे काय, किती ग्रामसेवकांकडे एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतींचा कार्यभार आहे, एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कार्यभार देण्याची कारणे काय आहेत तसेच सर्व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात काय, याबाबत गट विकास अधिकारी यांनी याबाबत होय, ग्रामसेवकांकडून सरपंचांचे प्रमाणपत्र घेतले जाते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्रामसेवक मुख्यालयी राहतात, असे प्रमाणपत्र सर्वच सरपंच देत असतात. आपण याबाबत तपासणी केली आहे का ? हा प्रश्न केवळ आपल्याच पंचायत समितीमधील नाही. सर्व राज्यात अशाप्रकारे बोगस प्रमाणपत्र दिले जाते. गट विकास अधिकारी यांनी याबाबतची खात्री करून जे ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसतील त्यांचा घरभाडे भत्ता थांबविला पाहिजे. ग्रामसेवकांकडून कामे होत नाहीत, अशी अनेक गावक-यांची तक्रार आहे. आपण ही बाब तपासून घ्यावी असे निदेश समितीने दिले असता गट विकास अधिकारी यांनी त्यास आश्वासित केले.

समितीने विचारणा केली की, पंचायत समिती लोहारामध्ये ३० ग्रामसेवक आहेत. सर्वच्या सर्व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात काय, याबाबत गट विकास अधिकारी यांनी सरपंचानी ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचा दाखला दिलेला आहे. तसेच जिल्हा परिषदेमध्ये आल्यापासून संपूर्ण जिल्हयातील ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचा दाखला सरपंचाकडून न घेता ग्रामसभेच्या कार्यवृत्तात असेल तरच ते ग्राह्य धरले जावे असे परिपत्रक काढलेले आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती विशद केली.

ग्रामसेवक मुख्यालयी राहतात यासंदर्भात ग्रामसभेच्या कार्यवृत्तात त्याचा समावेश असला पाहिजे यासंदर्भात आपण जे परिपत्रक काढले आहे ते समितीला उपलब्ध करुन द्यावे असे समितीने निदेश दिले असता त्याबाबत ठीक आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वासित केले. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन समितीला अहवाल पाठवावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेतील किती ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहतात, कर्मचारी मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र कोणत्या नियमानुसार ग्राह्य धरण्यात येते तसेच जे कर्मचारी मुख्यालयी रहात नाहीत अशा किती कर्मचा-यांचा घरभाडे भत्ता दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार थांबविण्यात आलेला आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सरपंच हे कार्यकारी पद असल्याने त्यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. तसेच जे कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत अशा कर्मचा-यांचा घरभाडे भत्ता दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ (परिशिष्ट १२.१)रोजीच्या शासन निर्णयानुसार थोपविण्यात आला आहे काय, याबाबत पंचायत समिती निहाय माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पंचायत समितीचे नाव | एकुण | | मुख्यालयी राहत असलेले | | मुख्यालयी राहत नसलेले | | मुख्यालयी राहत नसलेल्या ग्राविअ ग्रा.से.यांचा घरभाडे भत्ता बंद केल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्राविअ | ग्राम सेवक | ग्राविअ | ग्राम सेवक | ग्राविअ | ग्राम सेवक | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| (१) | उस्मानाबाद | १० | ७७ | १० | ७७ | ० | ० | ग्राविअ/ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याने घरभाडे भत्ता बंद करण्यात आलेला नाही. |
| (२) | तुळजापूर | १० | ६८ | १० | ६८ | ० | ० | |
| (३) | उमरगा | १६ | ४३ | १६ | ४३ | ० | ० | |
| (४) | लोहारा | ०९ | २७ | ०९ | २७ | ० | ० | |
| (५) | कळंब | ०८ | ५९ | ०८ | ५९ | ० | ० | |
| (६) | वाशी | ०४ | २४ | ०४ | २४ | ० | ० | |
| (७) | भूम | ०५ | ४८ | ०५ | ४८ | ० | ० | |
| (८) | परंडा | ०६ | ५१ | ०६ | ५१ | ० | ० | |
| एकुण | ग्रा.से | ६८ | ३९७ | ६८ | ३९७ | ० | ० | |
| एकुण | ग्राविअ | ६८ | ६८ | ६८ | ६८ | ० | ० | |

तसेच दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार थोपविण्यात आला आहे. या बाबत पंचायत समिती निहाय शिक्षकांची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका | शिक्षक संख्या | मुख्यालयी राहणारे | मुख्यालयी न राहणारे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | उस्मानाबाद | १०८१ | १०८१ | ० | शिक्षक मुख्यालयी राहत असल्याने घरभाडे भत्ता बंद करण्यात आलेला नाही |
| २. | तुळजापूर | ८६७ | ८६७ | ० | |
| ३. | उमरगा | ७९४ | ७९४ | ० | |
| ४. | लोहारा | ३३९ | ३३९ | ० | |
| ५. | कळंब | ६६८ | ६६८ | ० | |
| ६. | वाशी | २९४ | २९४ | ० | |
| ७. | भूम | ४८९ | ४८९ | ० | |
| ८. | परंडा | ४२४ | ४२४ | ० | |
| ९. | एकुण | ४९५६ | ४९५६ | ० | |

वरील प्रमाणे ग्रामसेवक व शिक्षक या संवर्गाची माहिती सादर करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय : (आस्था-१४) घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी ग्रामिण भागातील कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. याबाबत शासन निर्णय वित्त विभागाने दि.७ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचा अहवाल पाहता सर्व शिक्षक व ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी हे मुख्यालयी राहत असल्याचे दिसते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने अशी विचारणा केली की, ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत. समिती दौरे करते त्यावेळी न्यालयालयाचे आदेश आहे, मात्र तो एखाद्या प्रकरणाकरिता असतो. मुख्यालयी न राहणा-यांकडून घरभाडे भत्त्याची कपात करायची आहे. मात्र तशी कपात केली जात नाही. यासंबंधी दिनांक ०७.१०.२०१६ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. हा शासन निर्णय सर्व जिल्हा परिषदेतील गट विकास अधिकारी यांच्यापासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापर्यंत निर्गमित केला पाहिजे. सर्व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात, त्यामुळे त्यांचे घरभाडे भत्ता कापण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे सांगितले जाते. हा शासन निर्णय कोणालाच माहिती नाही असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता, त्याबाबत सचिव, ग्राम विकास विभाग यांची घरभाडे भत्त्याची रक्कम पगारातून कापली जाते. तसेच याबाबत शासन निर्णय सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात येईल असे आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ मध्ये या वर्षाच्या प्रशासन अहवालाच्या चर्चेच्या अनुषंगाने समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, वाशी येथे सन २०१२-१३ मध्ये ग्रामसेवकांची पाच पदे रिक्त होती. सद्यःस्थितीत ७ ग्रामसेवकांची पदे रिक्त आहेत. ९ ग्राम पंचायतीचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. जिल्हयातील ग्रामसेवक आणि शिक्षक मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाकडून प्रमाणपत्र घेतले जाते. या बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर राज्यात सर्वच ठिकाणी घरभाडे भत्ता दिला जात असल्याचे दिसून येत असल्याचे दिसून येत आहे. जे ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत त्यांचा घरभाडे भत्ता थांबविला पाहिजे.

जिल्हा परिषदेने उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, कळंब, वाशी, भूम, परांडा हया सर्व पंचायत समिती मध्ये प्रत्येक ठिकाणी समान म्हणजे ६८ ग्रामसेवक आणि ४९५६ शिक्षक मुख्यालयी राहत असल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली आहे, परंतु ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी न राहणारे याची उपस्थिती निरंक दर्शविली असल्याने समिती याबाबत खेद व्यक्त करीत आहे. ग्रामसेवक व शिक्षक मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सरपंच हे कार्यकारी पद असल्याने त्यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. तसेच जे कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत अशा कर्मचा-यांचा घरभाड भत्ता दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार थोपविण्यात यावा. समितीच्या मते घरभाडे भत्ता बंद करुन शासनाचा उद्देश सफल होणार नाही. ग्रामसेवक गावात राहत नसल्यास शासनाच्या कल्याणकारी योजना ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहचणार नाहीत. जिल्हा परिषदेने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निवाडयाचा आधार घेऊन मुख्यालयी न राहणा-या शिक्षकांचा घरभाडे भत्ता पुन्हा सुरु केला आहे.

वस्तुतः ग्रामीण भागात राहणा-या शासकीय कर्मचा-यांना घरभाडे भत्ता हा अनुज्ञेय नव्हता. दिनांक २० सप्टेंबर, १९८४ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयाद्वारे खेडे पातळीवर काम करणा-या शासकीय कर्मचा-यांना तेथील लोकवस्ती विचारात घेता तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी अनुज्ञेय असलेल्या दराने घरभाडे भत्ता दिनांक १ सप्टेंबर, १९८४ पासून मंजूर करण्यात आला. **'मात्र त्यात शर्त अशी होती की संबंधित कर्मचारी हे कामाच्या ठिकाणीच राहत असले पाहिजेत'** दरम्यानच्या काळात दिनांक २५ एप्रिल, १९८८ व दिनांक ५ फेब्रुवारी १९९० च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयामध्ये ही शर्त काढून टाकण्यात आली.

मा. उच्च न्यायालयाच्या निवाडयाच्या पार्श्वभूमीवर घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागातील कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य करणेबाबत वित्त विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी नव्याने शासन निर्णय निर्गमित करुन पुन्हा २० सप्टेंबर, १९८४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे ग्रामीण भागातील कर्मचा-यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय होण्याकरिता मुख्यालयी राहणे बंधनकारक केले आहे, याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी शासनाने घरभाडे अनुज्ञेय होण्यासाठी ग्रामीण भागातील कर्मचा-यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केलेले असले तरी राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामसेवक, शिक्षक, तलाठी, कृषी सहाय्यक, आरोग्य सेविका, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी, पशु वैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/कर्मचारी इत्यादी कर्मचारी बहुतांशी करुन ग्रामीण भागात राहत नाहीत. शहरातून दररोज गावात जाणे-येणे केल्यामुळे या गावातील विकासाच्या योजना, पाणी पुरवठयाच्या योजना, शेतीच्या संदर्भातील तज्ज्ञांच्या शिफारशी व

मार्गदर्शन, दुधाळ जनावरे व शेती उपयोगी पशुंना वेळेवर औषधोपचार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आपातकालीन रुग्णांना प्रथमोपचार इत्यादी अनेक सोई-सुविधांपासून वंचित राहावे लागते. बहुतांश ग्रामसेवक हे सरपंचाचा दाखला सादर करुन त्याद्वारे प्रमाणित करतात की ते मुख्यालयी राहतात हे कोणत्याही नियमात नमूद नसताना सर्रास या बाबीचा वापर केला जातो. सरपंच असे प्रमाणित करीत असल्यामुळे गट विकास अधिकारी त्यांची कोणतीही खातरजमा न करता त्यांना घरभाडे भत्ता अदा करतात. ग्रामसेवक मुख्यालयी राहण्याचे प्रमाणपत्र हे त्याठिकाणी वास्तव्य करतो त्या आधारेच देणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

यासंबंधी दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१६ रोजी शासनाने नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदरहू शासन निर्णय सर्व जिल्हा परिषदेतील गट विकास अधिकारी यांच्यापासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापर्यंत निर्गमित केला पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. **उपरोक्त शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता शासनाने ग्रामीण भागातील तसेच तालुका स्तरावरील प्रत्येक 'ब' 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचा-यांचे मुख्यालय कोणते व तो मुख्यालयी राहत असल्याबाबत कोणकोणते पुरावे ग्राहय धरावेत, तसेच तो कर्मचारी मुख्यालयी न राहता घरभाडे भत्ता घेत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिका-यावर निश्चित करुन तद्नुषंगाने स्वयंस्पष्ट आदेश शासनाने निर्गमित करावे व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट “अ”

## शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशिष्ट ११.१)

**जिल्हा परिषदेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या भेटी व दौरे-याबाबत.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
परिपत्रक क्रमांक:मविसे १०/२००२/प्र.क्र.४००४/आस्था-३
मंत्रालय,मुंबई-४०० ३२
दिनांक:-१० मार्च, २००८

संदर्भ:- शासन परिपत्रक ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.मविसे १०/२००२/प्र.क्र.४००४/आस्था-३ दिनांक :- ५ ऑगस्ट, २००५

परिपत्रक

सन १९९९-२०००च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०००-२००१ च्या वार्षिक प्रशासन-अहवालाच्या परिच्छेदावरील औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक १२ सप्टेंबर २००७ रोजी पंचायत समितीसमोर मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्या वेळी तपासणी अधिका-यांनी दौरा नोंदवहीत ( Tour Diary ) नोंद घेण्याबाबत समितीने सूचना दिल्या आहेत. समितीच्या सूचनेनुसार मा.सचिव ( ग्राम विकास व पंचायत राज ) यांनी तसे आश्वासन समितीस दिलेले आहे:-

जिल्हा परिषदेमधील खाते प्रमुखांनी पंचायत समितीच्या सभांना उपस्थित राहण्याबाबत संदर्भिय दिनांक ५.८.२००५ च्या शासन परिपत्रकानुसार सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा परिषदेमधील अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यविवरण नोंदवही व प्रवास दौरा नोंदवही ठेवण्याबाबत शासन परिपत्रक (इंग्रजी ) क्रमांक: झेडपीएमजी १६६८ /२०८३-जे, दिनांक २ मे, १९६८ आणि अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम निश्चित करण्याबाबतचे शासन परिपत्रक क्रमांक:पंरास १०८५ / प्र.क्र. १७२९ / २०, दिनांक २१ जुलै, १९८६ ची प्रत सोबत पाठविण्यात येत आहेत. तथापी या सूचनांचे काटेकोरपणे पालन होत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. तरी खालील प्रमाणे नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे.

१) जिल्हा परिषदेतील खाते प्रमुखांनी पंचायत समितीच्या सभांना उपस्थित राहून अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे व याबाबतची माहिती संबंधित जिल्हा परिषदेने प्रपत्र तयार करुन त्यामध्ये ठेवावी.

२) जिल्हा परिषदेतील खाते प्रमुखांनी तसेच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी भेटी व दौरे नियमानुसार केले पाहिजेत. भेटी व दौरे नियमापेक्षा जास्त किंवा कमी होता नयेत, याबाबतची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची नोंदवही ठेवण्यात यावी, व वरिष्ठांच्या भेटी तपासणी अधिका-यांनी केलेल्या दौ-याची नोंद दौरा नोंदवहीत ( Tour Diary ) काळजीपूर्वक घ्यावी व त्याखाली संबंधित अधिका-यांनी स्वाक्षरी ,दिनांक , वेळ इ. ची सुध्दा नोंद घ्यावी. दौरा नोंदवही खालील नमूद तक्त्यात असावी.

| तारीख | प्रवास कोठून | | | | भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी | अभिप्राय | भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | प्रवासाचे अंतर | मागील भेटीचा दिनांक | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | | | |

२) यासंदर्भात काही अडचणी येत असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि खातेप्रमुख यांनी एकत्रित बसून,याबाबत मार्ग काढावा.

४) जिल्हा परिषदेतील अधिकारी / कर्मचारी कामाच्या ठिकाणी फिरत राहून प्रवासभत्ता / महागाई भत्ता वसूल करतात. यामध्ये काही अतिरेक होऊन शासकीय पैशाचा अनावश्यक खर्च होतो कि काय, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे तसेच याबाबत काही बंधने घालणे आवश्यक असल्यास तशी उपाययोजना करावी.

३. सदर परिपत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात. उपरोक्त सूचनांचे पालन न झाल्यास, संबंधिताविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०१२०१५४८५१७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( [illegible] शिंदे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.
४. ग्रामविकास अंतर्गत कार्यक्रमातील सर्व [illegible] ( विकास / आस्थापना )
५. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी / इतर सर्व खाते प्रमुख
सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
उपसचिव (आस्था-१), उपसचिव (पंरा-१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग
सर्व कार्यासन अधिकारी, [illegible] ग्राम विकास व जलसंधारण विभाग
कक्ष अधिकारी, आस्थापना-१ ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१० निवड नस्ती ( आस्थापना-१ ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग

Zilla Parishads and Panchayat Samitis. Officers and servants under - Procedures f[or] maintenance and submission of diaries by t[hem].

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Rural Development Department.
Circular No. ZNG.1668/2083-A.
Sachivalaya, Bombay-32(BR), 2nd May 1968.

CIRCULAR

In Government Circular, Rural Development Department No.ZNG.1665/56381-A, dated the 30th November 1965 a revised procedure for maintenance and channel of submissi[on] of diaries by officers and servants under Zilla Parishads and Panchayat Samitis thereunder was prescribed. The Annual Development Conference held on the 18th and 19th May, 1966 of the Presidents of Zilla Parishads, the Chief Executive Officers of Zilla Parishads and Commissioners of Divisions made certain recommendations in thi[s] behalf. Government has considered these recommendations and is pleased to prescri[be] the revised procedure as under in supersession of the one prescribed in the Govern[m]ent Circular, Rural Development Department No.ZNG.1665/56381-A, dated the 30th November 1965.

2. Servants of the Zilla Parishads and Panchayat Samitis :-

(i) Type of Diaries :- Diaries will be of two types :

(A) a diary wherein the work done every day, whether on tour or not, is recorded;

A N D

(B) a tour diary wherein the work on tours only is recorded.

Senior Gram Sevaks, Gram Sevaks, Assistant Gram Sevaks and Assistant Extension Officers should maintain—

THANA ZILLA PARISHAD
THANA
INWARD NO. 1208 (126)
MAY 1968

(A) type of diary. They need not maintain separate

(B) Type of diary should be maintained by all Senior Extension Officers, Extension Officers and Junior Extension Officers. This diary should be used also for checking the travelling allowance bill by the Controlling Officers.

(ii) Form of Diaries :- The diaries should be in the following form:-

| Date. | Travel. | | | | Work done. |
|---|---|---|---|---|---|
| | From | To | Distance travelled. | Date of previous visit. | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

(iii) Channel of Submission of Diary :-

| Name of the functionary. 1 | Type of diary. 2 | Initial Submission. 3 | Circulated to in order. 4 |
|---|---|---|---|
| (1) Senior Gram Sevak. | A | Assistant Block Development Officer by 5th of every month. | Extension Officers concerned, Block Development Officer and Assistant Block Department Officer by the 20th of every month. |
| Gram Sevak. | A | | |
| Assistant Gram Sevak. | A | | |
| Assistant Extension Officers. | A | | |
| (2) Senior Extension Officers. | B | Assistant Block Development Officer by 5th of every month. | Block Development Officer, Head of the concerned Department in Zilla Parishad, Block Development Officer and Assistant Block Development Officer by the 20th of every month. |
| Extension Officers and Junior Extension Officers. | | | |

3. Officials at the Panchayat Samitis :-

(a) Gram Sevaks and Assistant Extension Officers :-

They should keep one register in the form of the prescribed diary. They should, however, submit copies of extracts of the diary to the Block Development Officers. The copies should be retained by the Block Development Officers after communicating the remarks to the Gram Sevaks and Assistant Gram Sevaks. The Extension Officers, Assistant Block Development Officers and the Block Development Officers visiting the Headquarters of the Gram Sevaks and Assistant Extension Officers should scrutinise their diaries upto the date of their visit with a view to ensuring that the diary is being written day to day. They may also be given suitable instructions at the time of their visit to these functionaries. The fact of having scrutinised the diary should be noted on the diary register at the time of their visit.

(b) Extension Officers :-

They should maintain one copy of the diary. The diary should be written day to day. They should however, submit copies of extracts of the diary to the Block Development Officers. The copies should be passed on by the Block Development Officers to the Head of the concerned Department under the Zilla Parishad, who after endorsing his remarks should return the same to the Block Development Officers concerned. The copies should be retained by the Block Development Officers after communicating the remarks to the Extension Officers.

(c) <u>Gram Sevaks, Assistant Extension Officers and Extension Officers</u>:-

They should write "details" of the work actually performed by them at the village visited etc. every day. By 'Details' it is meant that the entry should indicate the part actually played by the functionary so that it may be possible to know whether the work done is adequate or is on the right lines. The usual type of brief entries e.g. "visited and gave instructions", "visited and spoke to the people", etc. should be avoided.

4. <u>Officers under the Zilla Parishads</u> :-

(a) <u>Block Development Officers</u> :-

They should submit their tour programme by the 20th of the preceding month and the tour diary by the 10th of the succeeding month to the Chief Executive Officers. The tour programme need not be sent back to the Block Development Officers but it should be retained in the Office after issuing suitable instructions. There should be one copy of diary. The Block Development Officers should, however, submit extract of the diary to Chief Executive Officers who should retain them, and only the remarks should be communicated to the Block Development Officers through the Chairman of the Panchayat Samitis. It is not necessary to submit copy to the Commissioner of the Division but the Chief Executive Officer should forward a copy of his remarks to the Commissioner for his perusal and record.

(b) <u>Officers under the Departments of the Zilla Parishads(including the General Administration Department under the Chief Executive Officers)</u> :-

They should submit their tour programme by the 20th of the preceding month and tour diary by the 10th of the succeeding month to Heads of their Department under Zilla Parishad. The tour programme need not send back to the officer but should be retained in the office after issuing suitable instructions. There should be one copy of the tour diary. The Officer should however, submit extract of the diary to the Heads of their Departments who should forward it with their remarks to the Chief Executive Officers. <u>The Chief Executive Officers on recording their remarks</u> should return the extract to the concerned Head of the Department, who should retain it and only communicate the remarks to the concerned ~~[illegible]~~ officer through the Chairman of the concerned Subjects Committees.

(c) <u>Heads of Departments in the Zilla Parishads</u> :-

They should submit their tour programme by the 20th of the preceding month and tour diary by the 10th of the succeeding month. The tour programme should be retained in office after issuing suitable instructions. There should be one copy of the tour diary but the extract of tour diary should be submitted to the President of the Zilla Parishad through the Chief Executive Officer and the Chairman of the concerned Subject Committee . The Chief Executive Officer should send only a copy of the remarks passed thereon to the Regional Officer for perusal and record. The extract of the diary should be retained by the Chief Executive Officer after communicating remarks to the concerned Head of the Department.

(d) <u>Chief Executive Officers</u> :-

They should submit their tour programme by the 20th of the preceding month and tour diary by the 10th of the succeeding month to the Commissioner of the Division. The tour programme should be retained by the Commissioner after issuing suitable instructions. There should be one copy of the tour diary but the Chief Executive

Officer should send extract to the Commissioner who should retain the same and communicate the remarks to the Chief Executive Officer through the President of the Zilla Parishad.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S.I.KADIRI,
